। धाराशिव । वर्ष २७ वे । अंक १९५ वा । बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१₹ PRGI No. MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### लग्नाचे अमिष दाखवून अत्याचार:मुलीस दिला जन्म

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १५ वर्षीय ११ महिन्याची मुलगी सप्टेंबर २०२५ मध्ये भिमनगर धाराशिव येथे व ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ पावेतो ही अल्पवयीन असताना गावातील एका तरुणा लग्नाचे अमिष दाखवून नमुद तरुणानी तिचेशी वारंवार शारिरीक संबध ठेवल्याने ती गर्भवती होवून तिने एका मुलीस जन्म दिला आहे. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.११.१०.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं. कलम- ६४(१),६४(२)(एम), ६५(१), ६९ सह कलम ४, ८, १२ बा.लै.अ.सं. अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांची निर्दयपणे वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र एमएच ४३ बी.एक्स.१२८५ चा चालक यांनी दि.१२.१०.२०२६ रोजी सोलापूर हैद्राबाद जाणारे रोडवर तलमोड टोल नाका जवळ पिकअप मध्ये ८ देशी व जर्शी खोंड व कारवड असे एकुण ५९,००० किंमतीचे वाहनासह ५,५९,००० किंमतीचे गोवंशीय जनावरे त्यांचे चारपाण्याची व्यवस्था न करता वाहना मध्ये दाटी वाटीने भरुन वाहतुक करत असताना उमरगा पोलीस ठाण्याचे पथकास मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (डी), ११(ई), ५(अ), ९ सह ४७, ५४, ५६ प्रण्यांचे परिवहन नियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तडजोड शुल्क वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१२ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २१९ कारवाया करुन १,५९,२५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## रुग्णालयातील कंत्राटी पदभरतीची सोशल मीडियावरील जाहिरात अनधिकृत: फसव्या जाहिरातींपासून सावध राहा * पैसे देऊ नका जिल्हा शल्यचिकित्सकांचे आवाहन

धाराशिव, (जिमाका)- शासकीय रुग्णालय, धाराशिव येथे कंत्राटी पद्धतीने पदभरती करण्यात येत असल्याची जाहिरात इन्स्टाग्राम या सोशल मीडिया माध्यमावर प्रसिद्ध झाली आहे.मात्र,ही जाहिरात जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,धाराशिव किंवा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, धाराशिव यांच्यामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.त्यामुळे ही जाहिरात पूर्णपणे बनावट, अनधिकृत आणि उमेदवारांची आर्थिक फसवणूक करणारी असू शकते. अशा जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

शासकीय नोकरी मिळविण्याच्या आशेने अनेक तरुण-तरुणी विविध भरती प्रक्रियांची माहिती घेत असतात. विशेषतः सोशल मीडियावर प्रसिद्ध होणाऱ्या पदभरतीच्या जाहिरातींकडे इच्छुक उमेदवारांचे लक्ष वेधले जाते.मात्र, अशा जाहिरातींची अधिकृतता तपासल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवल्यास आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असते.या पार्श्वभूमीवर शासकीय रुग्णालयातील कंत्राटी पदभरतीसंदर्भात सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीबाबत जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने उमेदवारांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

इन्स्टाग्रामवर प्रसिद्ध झालेली संबंधित पदभरतीची जाहिरात जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तसेच जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने प्रसिद्ध केलेली नाही.त्यामुळे या जाहिरातीच्या आधारे कोणत्याही व्यक्तीने उमेदवारांकडे पैशांची मागणी केल्यास त्यावर विश्वास ठेवू नये,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयामार्फत उमेदवारांना दूरध्वनी करून कोणत्याही प्रकारच्या रकमेची मागणी करण्यात येत नाही.त्यामुळे पदभरतीच्या नावाखाली पैसे मागणारे फोन आल्यास उमेदवारांनी अशा फोन कॉलवर विश्वास ठेवू नये.तसेच संबंधित व्यक्तींशी कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करू नये,असे आवाहन करण्यात आले आहे.

आजच्या डिजिटल युगात विविध ऑनलाइन माध्यमांतून नोकरीच्या संधींच्या नावाखाली आमिषे दाखविली जाऊ शकतात.त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही डिजिटल अथवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरील भूलथापा आणि आमिषांना बळी पडू नये. विशेषतः शासकीय रुग्णालयातील नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली कोणी पैशांची मागणी करीत असल्यास उमेदवारांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

अशा अनधिकृत जाहिरातींवर विश्वास ठेवून किंवा कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून आर्थिक व्यवहार केल्यास त्यातून होणाऱ्या फसवणुकीस जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, धाराशिव जबाबदार राहणार नाही, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

शासकीय नोकरीच्या संधी शोधणाऱ्या उमेदवारांनी सोशल मीडियावरील जाहिरातींची खातरजमा करूनच पुढील कार्यवाही करावी.कोणत्याही प्रकारच्या आर्थिक आमिषाला बळी न पडता सावधगिरी बाळगावी,असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

## तुळजाभवानी नवरात्र महोत्सवानिमित्त महिला व बाल विकास विभागाच्या जनजागृती रथास व पथनाट्य अभियानास सुरुवात

धाराशिव, (जिमाका) - तुळजाभवानी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दि.१० ते २० ऑक्टोबर या कालावधीत महिला व बाल विकास विभाग, धाराशिव यांच्या वतीने महिला व बालविकास विभागाच्या विविध शासकीय योजना व कायद्यांबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या जनजागृती रथ व पथनाट्य अभियानाचे उद्घाटन ९ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव करण्यात आले,

या अभियानाच्या माध्यमातून तुळजाभवानी नवरात्र महोत्सवासाठी येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील भाविकांमध्ये तसेच नागरिकांमध्ये महिला व बालकांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे.महिला व बाल विकास विभागाच्या विविध शासकीय योजना,महिला सक्षमीकरण, बालकांचे हक्क व संरक्षण, बालविवाह प्रतिबंध,बालमजुरी प्रतिबंध,बालभिक्षेकरी रोखणे, तसेच हरवलेल्या बालकांच्या संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत जनजागृती रथ व पथनाट्याच्या माध्यमातून विविध ठिकाणी प्रभावीपणे माहिती प्रसारित करण्यात येणार असून,महिला व बालकांच्या समस्या आणि त्यांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय यंत्रणांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.या उपक्रमामुळे महिला व बालकांच्या सुरक्षिततेबाबत सामाजिक जाणीव वाढण्यास तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभगरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

फिरत्या रथाला विभागाच्या योजना व कायदेबाबत बॅनर्स व जिंगल्सद्वारे तचेस पथनाटयद्वारे कौटुंबिक हिंसाचार,बालविवाह, बाल भिक्षेकरी,चाईल्ड हेल्प लाईन (१०९८), हुंडा प्रतिबंध,कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ, अपराधी परिविक्षा अधिनियम, महिला समुपदेशन केंद्र,सखी वन स्टॉप सेंटर,बाल संगोपन योजना, बेटी बचाव बेटी पढाव,अनाथ प्रमाणपत्र,मुलांसाठी बालगृह, महिलांसाठी शक्ती सदन केंद्र, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सखी निवास या सर्व योजना / कायदे याची प्रचार प्रसिध्दी १० दिवस करण्यात येणार आहे.तसेच विभागाच्या सर्व योजना व कायदेविषयक माहितीचे फलक संपुर्ण शहरात लावण्यात आलेले आहेत.

यावेळी महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे व सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.तुळजाभवानी नवरात्र महोत्सवाच्या काळात विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या जनजागृती अभियानास नागरिकांनी सहकार्य करावे,असे आवाहन विभागाने करण्यात आले.

## धाराशिवच्या पाणीप्रश्नावर राणा दादांचा पुढाकार; संभाव्य टंचाई रोखण्यासाठी पाणी बचतीचे आवाहन!

### धरणांमध्ये केवळ ६.४४ टक्के उपयुक्त पाणीसाठा; पुढील दहा महिन्यांच्या नियोजनावर भर



धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)-धाराशिव जिल्ह्यातील घटत्या जलसाठ्याची गंभीर दखल घेत आमदार राणाजगजितसिंह पाटील (राणा दादा) यांनी नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले आहे. आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईचे आव्हान लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाण्याची परिस्थिती नागरिकांसमोर मांडून आतापासूनच खबरदारी घेण्याचा संदेश देतानाच, पिण्याचे पाणी आणि ग्रामीण भागातील गरजांना प्राधान्य देण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये ११ ऑक्टोबरपर्यंत केवळ ६.४४ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. १ सप्टेंबर रोजी ५९.६ दलघमी असलेला जलसाठा ११ ऑक्टोबरपर्यंत ४६.७५ दलघमीवर आला. अवघ्या ४१ दिवसांत पाणीसाठ्यात झालेली ही घट चिंताजनक आहे. वाढते तापमान, पाण्याचे बाष्पीभवन आणि भूजलपातळीतील घसरण यामुळे आगामी काळात पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन पुढील दहा महिने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन राणा दादांनी केले आहे.

संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रत्येक गावात नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता आणि ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार मिळवून देणे या महत्त्वाच्या बाबींवर भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. २०१५ मध्ये जिल्ह्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी जलसाठा १२ दलघमीपर्यंत घसरला होता आणि नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी ४६८ टँकर सुरू करावे लागले होते. अशा परिस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वेळीच नियोजन आणि पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**पाणी बचतीसाठी सर्वपक्षीयांनी एकत्र येण्याचे आवाहन**

पाणीटंचाईचा सामना करणे ही केवळ शासन आणि प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांचाही त्यात महत्त्वाचा सहभाग आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आणि पाणीपुरवठ्याच्या नियोजनाला सहकार्य करणे, ही काळाची गरज असल्याचे राणा दादांनी सांगितले. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वपक्षीयांनी सामूहिक जबाबदारीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्ह्यातील पाणीस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि संभाव्य संकटासाठी प्रशासनासह समाजाने सज्ज राहणे, हा त्यांच्या आवाहनाचा मुख्य उद्देश आहे.

## शारदीय नवरात्र महोत्सवात अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी 'गुड समॅरिटन' ॲपचा वापर करावा

तुळजापूर (जिमाका)- महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवींच्या शारदीय नवरात्र महोत्सवास कालपासून सुरुवात झाली असून,या कालावधीत देवीच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक तुळजापुरात येत आहेत.या पार्श्वभूमीवर रस्ते अपघातातील जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळावी आणि आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदतीसाठी पुढाकार घेता यावा, यासाठी 'गुड समॅरिटन' (Good Samaritan) ॲपचा वापर करावा,असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात येत आहे.

रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता मदत करणाऱ्या नागरिकाला 'गुड समॅरिटन' असे म्हणतात. अपघातानंतर जखमी व्यक्तीला शक्य तितक्या लवकर वैद्यकीय उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते.अपघातानंतरचा पहिला तास हा 'गोल्डन अवर' म्हणून ओळखला जातो.या कालावधीत योग्य वैद्यकीय मदत मिळाल्यास जखमी व्यक्तीचे प्राण वाचण्याची शक्यता वाढते.त्यामुळे अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करण्यासाठी नागरिकांनी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने पुढाकार घ्यावा.

'गुड समॅरिटन' ॲपच्या माध्यमातून उपलब्ध सुविधांनुसार अपघाताची माहिती देणे, छायाचित्रे अपलोड करणे तसेच संबंधित यंत्रणांशी संपर्क साधणे शक्य होऊ शकते. भाविकांनी गुगल प्ले स्टोअरवरून हे ॲप डाउनलोड करून त्यामध्ये आवश्यक असलेल्या परवानग्या, लोकेशन सेटिंग्ज आणि संपर्क सुविधांची तपासणी करून घ्यावी. ॲपचा वापर करताना त्यामधील सूचनांचे पालन करावे.

अपघात किंवा अन्य वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका सेवेसाठी १०८ या टोल फ्री क्रमांकावर तातडीने संपर्क साधावा.अपघातग्रस्तांना मदत करताना स्वतःची सुरक्षितता जपावी आणि जखमी व्यक्तीला लवकरात लवकर वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

**'गुड समॅरिटन' ॲप संदर्भात अधिक माहितीसाठी संपर्क**

'गुड समॅरिटन' पवर आयडी (ID) तयार करण्यासाठी किंवा यासंदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी तुळजापूर ईआर.सी.(ERC) टीमच्या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा,असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात येत आहे.

१) तुळजापूर ई.आर.सी. डेस्क (अधिकृत) - ९७६६०३७१६४

२) अमेश वाय. कांबळे (ऑपरेशन्स डेस्क) - ९७६६०३६९८५

३) नवीन यू. येरेकर (टीम लीडर) - ९०९६१९८८६७

४) विशाल व्ही. जाधव (ई.आर.ओ.) - ९७६७३८२६९०

५) प्रीतील एल. पवार (ई.आर.ओ.) - ७०५८३६१२८९

६) भूषण एच. पवार (ई.आर.ओ.) - ७२१९१८३३९०

७) स्वप्निल एस. क्षीरसागर (ई.आर.ओ.) - ७६२०७५३८८४

यांच्याशी संपर्क साधावा.

## जवाहर नवोदय विद्यालयाच्या ९ वी व ११ वी प्रवेश अर्जास १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

### १० एप्रिल २०२७ रोजी प्रवेश परीक्षा : पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका) ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या तुळजापूर येथील पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता नववी व अकरावीच्या लेटरल एन्ट्री (पार्श्व प्रवेश) प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी होणाऱ्या या प्रवेश प्रक्रियेत जिल्ह्यातील अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे,असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंके आणि उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) दत्तात्रय लांडगे यांनी केले आहे.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागांतर्गत कार्यरत असलेले पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, तुळजापूर हे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई), नवी दिल्लीशी संलग्न निवासी विद्यालय आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निवासी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या या विद्यालयात इयत्ता नववी व अकरावीच्या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी लेटरल एन्ट्री प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी इयत्ता नववी व अकरावीमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. ही प्रवेश परीक्षा शनिवार,१० एप्रिल २०२७ रोजी तुळजापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून,अर्ज करण्याची अंतिम मुदत यापूर्वी ३० सप्टेंबर २०२६ निश्चित करण्यात आली होती.मात्र,विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी आणखी संधी मिळावी,या उद्देशाने ही मुदत आता १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

इयत्ता नववीच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता आठवीत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.इयत्ता आठवीचा निकाल जाहीर झाल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्ष २०२७-२८ मध्ये इयत्ता नववीत प्रवेश दिला जाणार आहे.या प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी https://cbseitms.nic.in/2026/nvsix या संकेतस्थळावर जाऊन १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भवितव्यासाठी जवाहर नवोदय विद्यालयातील प्रवेश ही एक महत्त्वाची संधी आहे.विशेषतः ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना निवासी वातावरणात शिक्षण घेण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे जिल्ह्यातील पालकांनी आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीचा विचार करून या प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा. तसेच संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांपर्यंत प्रवेश परीक्षेची माहिती पोहोचवून त्यांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करावे,असे आवाहन जिल्हा शिक्षणाधिकारी सुधा साळुंके व जिल्हा उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे यांनी केले आहे

प्रवेश परीक्षेबाबत अधिक माहिती किंवा अर्ज प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन आवश्यक असल्यास परीक्षा प्रमुख डी.डी.राऊत यांच्याशी ८८६२००८१९० या क्रमांकावर, तर सहायक परीक्षा प्रमुख एस.आर. गज्जम यांच्याशी ९९२१७३०३५७ या क्रमांकावर संपर्क साधावा,अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य ए.एस.कांबळे यांनी दिली.

पात्र विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आपले ऑनलाइन अर्ज वेळेत भरावेत.जिल्ह्यातील एकही इच्छुक व पात्र विद्यार्थी केवळ माहितीअभावी या संधीपासून वंचित राहू नये,यासाठी पालक,शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन विद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सेवा संकल्प अभियान:आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळा व वसतिगृहात विविध उपक्रम

धाराशिव, (जिमाका) शासकीय आश्रमशाळा,अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहामध्ये स्वच्छ,सुंदर, निरोगी व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने २ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोंबर २०२६ या कालावधीत विशेष स्वच्छ,सुंदर व निरोगी आश्रमशाळा व वसतिगृह अभियान राबविण्यात येत आहे.त्यानुसार या कार्यालयाच्या अधिनस्त ३ शासकीय आश्रमशाळा,२ अनुदानित आश्रमशाळा व ६ शासकीय वसतिगृहे कार्यरत असुन या आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांमध्ये वरील कालावधीत आयोजीत करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अभियान कालावधी हा असून दिनांक ०२ ऑक्टोंबर २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोंबर, २०२६ दिवसनिहाय स्वच्छता मोहिम, दिनांक २ ऑक्टोबर शुक्रवार स्वच्छता अभियानाचा शुभारंभ,३ ऑक्टोबर शनिवार परिसर स्वच्छता दिवस,४ ऑक्टोबर रविवार वर्गखोली व शैक्षणिक परिसर स्वच्छता,५ ऑक्टोबर सोमवार वसतिगृह स्वच्छता दिवस,६ ऑक्टोबर मंगळवार स्वच्छतागृह व स्नानगृह दिवस,७ ऑक्टोबर बुधवार पिण्याचे पाणी व जलस्रोत स्वच्छता दिवस,८ ऑक्टोबर गुरुवार स्वयंपाकगृह व भोजनगृह स्वच्छता दिवस,०९ ऑक्टोबर शुक्रवार घनकचरा व्यवस्थापन दिवस,१० ऑक्टोबर शनिवार सांडपाणी व जलनिस्सारण दिवस,११ ऑक्टोबर रविवार मुलींची स्वच्छता व मासिक पाळी व्यवस्थापन दिवस, १२ऑक्टोबर सोमवार हरीत व सुंदर आश्रमशाळा दिवस,१३ ऑक्टोबर वैयक्तिक स्वच्छता दिवस व आरोग्य दिवस,१४ ऑक्टोबर स्वच्छता जनजागृती व विद्यार्थी सहभाग दिवस,१५ ऑक्टोबर अनावश्यक साहीत्य व अभिलेख/साठा व्यवस्थापन दिवस,१६ ऑक्टोबर रोजी संपुर्ण आश्रमशाळा/वसतिगृह अंतिम स्वच्छता व तपासणी दिवस,१७ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वच्छ आश्रमशाळा संकल्प व स्वयंमुल्यांकन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पाणी कपातीचे धोरण योग्यच...

राज्यात आता पाणी कपातीचे धोरण राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. यावर्षी पाण्याची समस्या निर्माण होणार असे दिसून येत होते कारण अलनिनोचा धोका आहे असे गतवर्षीच हवामान तज्ज्ञांनी सांगितले होते. गतवर्षीच पावुसकाळ कमी होणार असे भाकित केले होते. तेही विज्ञानाला धरून मत व्यक्त केले होते. आता हवामान विभागात विज्ञानाची साथ घेवुन मत व्यक्त केले जात आहे. पुर्वी सारखा अंदाज नाही. पुर्वी जुनी मंडळी ही अंदाज पाहून मत व्यक्त करीत होती. एक पारंपारिक ज्ञानाच्या जोरावर मत व्यक्त करीत होती. आता तसे नाही. जागतिक स्तरावर हवामान विभाग हा सक्षम बनला आहे. जागतिकस्तरावरील हवामानाचा अंदाजनुसार मत व्यक्त केले जाते. वास्तविक ते पुर्ण चुकीचे ठरत नाही. विज्ञानाची साथ घेवून कोणतेही काम केल्यास ते सहसा चुकीचे ठरत नाही. गत वर्षी शेवटच्या काही महीण्यात पाऊस कमी होणार. पाण्याची समस्या निर्माण होणार. शेतकरी संकटात सापडणार असे विविध भाकित केले होते. तज्ज्ञांच्या मतानुसार आगामी काळासाठी नियोजनाची मोठी गरज होती. संकटाचा ईशारा जर जर्मन, जपान किंवा चीनला मिळाला असता तर त्यांनी संकटातून बाहेर पडण्यासाठी उपायोजना केल्या असत्या. आगामी काळात येत्या दोन-चार महिण्यात पाण्याचे दुर्भिक्षामुळे काय स्थिती निर्माण होईल हे आज सांगता येत नाही. जून महिण्यापासून ते ऑक्टोबर पर्यंतचा अंदाज पाहिला तर परिस्थिती कठिण दिसून येते. अलनिनोचा परिणाम दिसून आला. गत वर्षीच नियोजन केले असते तर आज किंवा आगामी प्रमाणात भयाण स्थिती निर्माण होण्यापासून बचाव केला असता. मुळात काय होते अशा विचारात राहील्याचा हा परिणाम दिसून येत आहे. पाण्याचे संकट केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही तर देशातील अनेक राज्यात ही परिस्थिती दिसून येत आहे. त्यामुळे गतवर्षीच पाण्याचे नियोजन करणे अपेक्षित होते. गतवर्षापासून कडक धोरण राबविले असते तर संकटाची झळ कमी प्रमाणात बसली असती. अन्नधान्याचीप टंचाईवर मात करता आली असती, अन्न-धान्याची कमतरता भासली तर परदेशातून मागविता येते. तीन वेळा भोजना एवजी दोन वेळा करता आले असते मात्र पाण्याची टंचाई कशी भरून काढणार! कृत्रिमरित्या पाण्याची निर्मिती करता येत नाही. निसर्गाशिवाय पाणी निर्मिती होत नाही. निसर्गावर भारतील शेती आवलंबुन आहे हे लक्षात घेतले पाहीजे. पाण्याशिवाय माणसेच काय जनावरे सुद्धा जगविता येत नाहीत. शासनाकडून पशुधन विक्रीकरू नका असो सल्ला दिला आहे मात्र पशुधन जगवायाचे कसे? हे मोठे संकट आहे. त्यांना कडबा, पाणी पाजणे. उन्हापासून बचाव कशाप्रकारे करावयाचा ही मोठी समस्या आहे. त्यामुळे पाण्यामुळे संकट निर्माण होणार आहे. अजुनही पाण्याची काटकसर नाही. पाणी संरक्षित करण्याकडे कल दिसून येत नाही. केवळ घोषणा केल्या जातात. जेथे पाणी साठा आहे तेथे संरक्षणार्थ पाहारा देण्याची गरज आहे. पहिल्यांदा ज्या पिकांना अधिक पाणी लागते ते पेरणे, लागवड करणे बंद करावे. ज्वारी, बाजरी असे कमी पाण्याचे पिक घ्यावी लागणार आहेत. जेथे पाणीसाठा आहे. जेथून शहराला, गावांना पाणीपुरवठा होते तेथे संरक्षणार्थ पोलिस यंत्रणा राबवावी लागेल. काही ठिकाणी पाणी साठ संपत आल्याने नदी-बंधाऱ्यावर ईलेक्ट्रिक मोटारी तशाच आहेत. त्या चोरी जाण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या बाबत लक्ष द्यावे लागणार आहे. मुळात पाणी संकटाबाबतची चाहुल गतवर्षापासून दिली जात असताना शासन, प्रशासन व नागरिकांनी कोणती उपायोजना केली आहे याचा प्रथम विचार करावा लागणार आहे. यापुर्वीही उपायोजना केली नाही व यापुढे काय करणार या बाबत ठोस असे नियोजन दिसून येत नाही. वास्तविक आजचे संकट उद्यावर ढकलू शकतोत, त्यासाठी आतापासून नियोजन तेही कडक राबवावे लागणार आहे. पोकळ धोरणाचा तडाखा गंभीर स्वरुपाचा बसणार आहे. काही झाले तरी नियोजन व कडक उपायाची गरज आहे. ईतर देशात अशी सुचना मिळाताच उपायोजना करण्यात सुरवात होते. भारतात मात्र गंभीरतेने घेतले जात नाहीत.

* पिण्याचे पाणी संकट अटळ दिसून येत आहे. पावसाळा अल्प झाला आहे. याचा परिणाम हिवाळ्यात उष्णता जाणवत आहे. पाऊमान कमी झाल्याने बाजारात तेही सणासुदीच्या काळात खरेदी करण्यासाठी कमी वर्दळ दिसून येत आहे. शाासनाने दुष्काळतर जाहिर केला आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी ठोस उपायोजनाची मोठी गरज आहे ती दिसून येत नाही. पाणीटंचाई भासणार हे एकवर्षापुर्वी कळाले असताना कोणती उपायोजना केली या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. पाऊस पडल्यावरच पाणी टंचाई भासणार नाही हे सर्वांना कळते मात्र पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आता तरी ठोस उपायोजनाची गरज आहे. तसे पाहिले तर महाराष्ट्रात मोठी धरणे नाहीत. बंधाऱ्याची उपलब्धता कमी आहे. पाणी साठवणुकीसाठी योजना अपुऱ्या आहेत. पाणी जमीनीत मुरणे अतिषय महत्वाचे आहे. आता एक योजना नाही तर अनेक योजना राबविण्याची गरज आहे. पाणी जमीनीत कसे मुरेल याचा विचार केला पाहिजे. पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खोलवर गेली आहे. दोन ऋतूनंतर पावसाळा येणार आहे. हिवाळ्यानंतर उन्हाळा येतो, त्यानंतर पावसाळा सुरू होतो. तो पर्यंत तग धरून राहाणे आवघड आहे. कशा प्रकारे पाणी संकटावर मात करायाची हा सर्वात मोठा प्रश्न दिसून येत आहे. अलनिनोचे संकट कळाल्यानंतरही ठोस उपायोजना केली नाही. त्यामुळे पाणी संकटावर कशाप्रकारे मात करायाची हा राज्यातील जनतेला पडलेला प्रश्न आहे. यावर उपायम्हणून पैसे खात्यावर जमा होतील, पैसा असून पाणी आणायाचे कोठून हा प्रश्न आहे. मुळात अजूनही संकटावर मात करता येवू शकते. आहे तेथील पाणीसाठ्याची जोपासणा केली पाहिजे. पाणी चोरी होता कामा नये. पाण्याचा उपसा कमी प्रमाणात झाला पाहिजे. काही नियम बनवुन त्यानुसार वाटचाल केली तर हे संकट पार करता येईल. यासाठी कडक नियमावलीची गरज आहे. आजही नळास अनेक तास पाणी सोडले जाते. पाण्याचा अपव्यय अधिक प्रमाणात दिसून येत आहे. पाण्याची नासाडी करू नका. पाण्याची काटकसर हीच बचत आहे. मुळात पाणी संकटाची चाहूल लागली असताना काही केले नाही हेच दुदैव आहे. त्यामुळे अजूनही तातडीने सतर्क होण्याची गरज आहे. कठोर नियोजनाची गरज आहे.

# सह्याद्री ते किलिमांजारो :जिद्दीच्या शिखराकडे







काही प्रवास केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचण्यासाठी नसतात. ते माणसाला स्वतःशी नव्याने भेट घडवतात, आपल्या क्षमतांची ओळख करून देतात आणि मनातील भीतीवर मात करण्याचे बळ देतात. माझ्यासाठी किलिमांजारोचा प्रवास असाच-स्वतःचा शोध घेणारा, आत्मविश्वास वाढवणारा आणि आयुष्याला नवी दिशा देणारा ठरला.

२४ जुलै २०२६ रोजी सकाळी आठ वाजता, समुद्रसपाटीपासून ५,८९५ मीटर उंचीवर असलेल्या आफ्रिकेतील सर्वोच्च 'उहुरू पीक'वर मी उभा राहिलो. त्या क्षणी माझ्या आयुष्यातील एक मोठे स्वप्न साकार झाले. माझ्यासमोर केवळ एक पर्वतशिखर नव्हते; तर अनेक वर्षांची मेहनत, असंख्य डोंगरवाटा, पहाटेच्या धावा, व्यायामशाळेत गाळलेला घाम, मित्रांची साथ आणि कुटुंबाचा विश्वास उभा होता. हा केवळ किलिमांजारो सर केल्याचा आनंद नव्हता; तो स्वतःच्या मर्यादांवर मिळवलेला विजय होता.

माझ्या गिर्यारोहणाच्या प्रवासाची सुरुवात महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून झाली. सह्याद्रीने मला पर्वताचा आदर करायला आणि प्रत्येक पाऊल स्वतःच्या सामर्थ्यावर टाकायला शिकवले. पुढे ट्रेकिंगची आवड वाढत गेली. याच ओढीने मला एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंत नेले. हिमालयाचे विराट रूप अनुभवताना मनात मोठी स्वप्ने आकार घेऊ लागली. भूतानमधील ट्रेकदरम्यान मनात प्रश्न निर्माण झाला-आता पुढचे शिखर कोणते? उत्तर होते-किलिमांजारो!

कुटुंब, नोकरी आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळत या मोहिमेसाठी जवळपास चार महिने कठोर तयारी केली. पहाटे धावणे, आठवड्याच्या शेवटी हायकिंग करणे, स्ट्रेंथ ट्रेनिंग आणि इन्क्लाइन ट्रेडमिलवर सराव करणे, हा दिनक्रमाचा भाग बनला. या प्रशिक्षणातून शरीरासोबत मनालाही एकच संदेश दिला-हे कठीण आहे; पण अशक्य नाही!

सात दिवसांची किलिमांजारो मोहीम आम्ही 'मचामे रूट'ने पूर्ण केली. दाट जंगल, खडकाळ प्रदेश, बोचरे वारे आणि सातत्याने बदलणाऱ्या हवामानातून वाटचाल करताना स्वाहिली भाषेतील 'पोले पोले' हा शब्द आमचा मूलमंत्र ठरला. त्याचा अर्थ-हळूहळू. पर्वतावर वेगापेक्षा सातत्य अधिक महत्त्वाचे असते, याची जाणीव या प्रवासाने करून दिली.

उंची वाढत गेली, तसतसा शरीरावरील ताण वाढू लागला. ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यामुळे प्रत्येक पाऊल जड वाटत होते. शरीर थांबायला सांगत होते; पण मन म्हणत होते-आणखी एक पाऊल! अशाच असंख्य छोट्या पावलांनी मी शिखर गाठले. मोठी उद्दिष्टे एका मोठ्या झेपेने नव्हे, तर छोट्या-छोट्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी साध्य होतात, हा धडा किलिमांजारोने दिला.

शिखरावरील सूर्योदय, अथांग आकाश, गोठवणारी थंडी आणि मनात दाटलेली शांतता-तो अनुभव शब्दांच्या पलीकडचा होता. त्या क्षणी सह्याद्रीच्या वाटा, एव्हरेस्ट बेस कॅम्प, कठोर प्रशिक्षण, मित्रांची साथ आणि कुटुंबाचे प्रोत्साहन डोळ्यांसमोर तरळून गेले. कोणतेही मोठे शिखर एकट्याने गाठता येत नाही. सहप्रवासी मित्र, ट्रेक लीडर्स, स्थानिक गाईड्स आणि संपूर्ण सहायक पथकामुळे हा प्रवास यशस्वी झाला.

माझ्या प्रत्येक पावलामागे कुटुंबाचा विश्वास होता. विशेषतः पत्नीला दिलेले-मी हे करून दाखवणार!-हे वचन सतत प्रेरणा देत राहिले. महापारेषणमधील जबाबदारीच्या नोकरीने मला शिस्त व जबाबदारी शिकवली; कुटुंबाने स्थैर्य दिले; मित्रांनी ऊर्जा दिली आणि पर्वतांनी स्वतःला ओळखायला शिकवले.

किलिमांजारोचे शिखर गाठले असले, तरी प्रवास संपलेला नाही. कारण प्रत्येक शिखर हा शेवट नसतो; ती पुढच्या स्वप्नाची सुरुवात असते. आता मनात पुन्हा तोच प्रश्न आहे-पुढचे शिखर कोणते?

कारण शिखर गाठणे म्हणजे केवळ यश मिळवणे नव्हे; तर स्वतःवरील विश्वास अधिक दृढ करणे होय!

**-विनय खेडेकर**
**अतिरिक्त कार्यकारी अभियंता**
**राज्य पारेषण उपक्रम, महापारेषण**

# मध्य रेल्वेने आमला रेल्वे जलाशयाची पाणी साठवण क्षमता ३.५ पटीने वाढवली

## पाणी साठवण क्षमतेत वाढ आणि पाण्याची गुणवत्ता सुधारून मध्य रेल्वेची संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्याची तयारी

**नागपूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेने नागपूर विभागातील आमला रेल्वे जलाशयात गाळ काढणे आणि विविध दुरुस्तीची कामे पूर्ण केली आहेत. जलसंधारण सुधारणे, उपलब्ध जलस्रोतांचा इष्टतम वापर करणे आणि रेल्वेच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करणे या उद्देशाने ही कामे हाती घेण्यात आली होती. या कामांमुळे जलाशयाच्या पाणी साठवण क्षमतेत लक्षणीय वाढ झाली असून, उपलब्ध जलस्रोतांचा अधिक प्रभावीपणे वापर करणे शक्य झाले आहे.

पाणी साठवण क्षमतेत लक्षणीय वाढ: आमला रेल्वे जलाशयात अंदाजे ३०० मीटर ÷ १९८.५ मीटर क्षेत्रफळावर आणि सरासरी ४ मीटर खोलीपर्यंत गाळ काढण्याचे काम करण्यात आले. या कामामुळे जलाशयाची पाणी साठवण क्षमता ९३.७५ दशलक्ष लिटरवरून ३३१.९५ दशलक्ष लिटरपर्यंत वाढली आहे. म्हणजेच, पाणी साठवण क्षमतेत अंदाजे २३८.२ दशलक्ष लिटर (२३.८२ कोटी लिटर) इतकी वाढ झाली असून, ती मूळ क्षमतेच्या ३.५ पट आहे. साठवण क्षमतेतील या भरीव वाढीमुळे उपलब्ध जलस्रोतांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करणे शक्य होईल आणि परीचालनाच्या गरजांनुसार पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मदत होईल.

पाण्याची उत्तम गुणवत्ता आणि वाढलेली सुरक्षितता: गाळ काढण्याच्या कामासोबतच जलाशयाची स्वच्छताही झाली असून, यात अंदाजे २.३८ लाख घनमीटर गाळ काढण्यात आला. यामुळे पाण्याची गुणवत्ता सुधारली असून वापरासाठी अधिक सुरक्षित पाणी उपलब्ध झाले आहे. ही कार्यवाही रेल्वेवरील पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबतच्या 'सीएजी' अहवालावर आधारित उपाययोजनांशी आणि सुरक्षित व स्वच्छ पाणी पुरवण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याबाबतच्या रेल्वे बोर्डाच्या निर्देशांशी सुसंगत आहे. गाळ काढणे आणि स्वच्छतेच्या या कामांनी मध्य रेल्वेवर राबवण्यात आलेल्या 'स्वच्छता ही सेवा', 'स्वच्छता पंधरवडा' आणि 'विशेष मोहीम ६.०' यांसारख्या स्वच्छता मोहिमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



जलाशयाशी संबंधित संरचनांची स्थिती आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी दुरुस्ती व देखभालीची कामे हाती घेऊन ती पूर्ण करण्यात आली. यामध्ये 'इनटेक वेल'ची (पाणी उपसा विहीर) दुरुस्ती, १०० चौरस मीटर क्षेत्रावरील प्लास्टरचे काम आणि २० मीटर लांबीच्या पादचारी मार्गाचे काम यांचा समावेश आहे.

जलसंधारण आणि संसाधन व्यवस्थापन बळकट करणे - दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्जता: महाराष्ट्रात (विशेषतः आसपासच्या भागात) उद्भवू शकणाऱ्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करता, आमला रेल्वे जलाशयाच्या ठिकाणी हाती घेण्यात आलेली कामे ही जलसंधारण आणि उपलब्ध साठवण क्षमतेचा कार्यक्षम वापर करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहेत. गाळ काढल्यामुळे जलाशयाची पाणी साठवण्याची क्षमता वाढली आहे; तसेच इनटेक वेल (पाणी ठेवण्याची विहीर), गेट्स, मार्ग आणि इतर संबंधित संरचनांच्या दुरुस्तीमुळे पाण्याची गुणवत्ता सुधारली असून, यामुळे जलाशयाची देखभाल आणि संचालन करण्यास मदत होईल.

या उपक्रमामुळे उपलब्ध जलसंपत्तीचे व्यवस्थापन सुधारण्यास, रेल्वेच्या पाण्याची गरज भागवण्यास आणि जलसंधारणाचे प्रयत्न बळकट करण्यास मदत होईल. मध्य रेल्वे रेल्वेच्या पायाभूत सुविधांची देखभाल करण्यास, जलसंपत्तीचा विवेकी वापर करण्यास आणि शाश्वत विकासाला चालना देण्यास कटिबद्ध आहे. आमला रेल्वे जलाशयाच्या ठिकाणी पूर्ण झालेली कामे या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहेत.

# शारदीय नवरात्रौत्सव लेखमाला

## कर्तृत्वशील नवदुर्गा २०२६ लेख क्र. ०५

*उच्चशिक्षित सूनेचा आदर्श, करिअरचा त्याग करून एकत्र कुटुंब जपणारी माऊली – सौ. अंबिका पोतदार सोलापूर.*



नवरात्र उत्सव म्हणजे आदिशक्तीच्या विविध रूपांचा जागर. आजच्या आधुनिक युगात स्त्री केवळ घरापुरती मर्यादित राहिलेली नाही. तिने शिक्षणाच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. मात्र खऱ्या अर्थाने नवदुर्गा तीच ठरते, जी उच्चशिक्षित असूनही आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, कुटुंबातील वृद्धांची सेवा आणि मुलांचे संगोपन यासाठी आपल्या करिअरचा आनंदाने त्याग करते आणि कुटुंबालाच आपली कर्मभूमी मानते.

सोलापूरच्या अशाच एक सुविद्य आणि कर्तव्यदक्ष गृहिणी, माझी सून सौ. अंबिका किरण पोतदार यांचा जीवनप्रवास आजच्या आधुनिक स्त्रियांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे.

**माहेरचे सुसंस्कार आणि उच्च शिक्षणाची ओढ**

सौ. अंबिका पोतदार यांचे माहेर यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील आहे. त्यांचे वडील कै. सुरेशराव महामुनी आणि आई श्रीमती कांताबाई यांच्या सुसंस्कारी कुटुंबात अंबिका यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच हुशार आणि अभ्यासू असलेल्या अंबिका यांनी शिक्षणाला आपले ध्येय बनवले. विज्ञान शाखेतून पदवी घेतल्यानंतर त्यांनी औषधनिर्माण शास्त्र या अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या क्षेत्रात एम. फार्मसी सारखी उच्च पदवी अत्यंत उत्कृष्ट गुणांनी संपादन केली. माहेरून मिळालेले उत्तम संस्कार, चिकाटी आणि उच्च शिक्षण यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच प्रगल्भता आली.

**संसाराची सुरुवात आणि करिअरची वाटचाल**

उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अंबिका यांचा विवाह माझे चिरंजीव किरण वसंत पोतदार यांच्याशी झाला. किरण पोतदार हे स्वतः अत्यंत उच्चशिक्षित असून त्यांनी एम.बी.ए. आणि एल.एल.बी. चे शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ते एका राष्ट्रीयकृत बँकेत 'चीफ सिनियर मॅनेजर (लीगल)' या अत्यंत जबाबदार आणि उच्च पदावर कार्यरत आहेत.

लग्नानंतर पतीची नोकरी पुण्यात असताना, अंबिका यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग करत एका नामांकित फार्मास्युटिकल कंपनीत दोन वर्षे नोकरी केली. पतीची बदली सोलापूरला झाल्यानंतर बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत त्यांनी सोलापूर येथील एका फार्मसी कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली. आपल्या ज्ञानाचा फायदा विद्यार्थ्यांना करून देत त्यांनी दोन वर्षे तिथे अत्यंत निष्ठेने ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले.

**कुटुंबासाठी करिअरचा स्वेच्छेने त्याग**

करिअरच्या आलेखात नवनवीन शिखरे सर करत असतानाच, सौ. अंबिका यांच्या आयुष्यात एक महत्त्वाचा वळणबिंदू आला. पती किरण यांची सोलापूरहून अहमदाबाद (गुजरात राज्य) येथे बदली झाली. एका नव्या राज्यात, नव्या वातावरणात संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी सांभाळणे हे मोठे आव्हान होते.

अशा वेळी अनेक जण स्वतःच्या करिअरला प्राधान्य देतात. मात्र सौ. अंबिका यांनी अत्यंत परिपक्वतेने आणि आनंदाने आपल्या चालत्या-बोलत्या उज्ज्वल करिअरला पूर्णविराम देण्याचा धाडसी निर्णय घेतला. एम. फार्म सारखी उच्च पदवी असूनही, त्यांनी कोणतीही खंत न बाळगता स्वतःला पूर्ण वेळ कुटुंबासाठी समर्पित केले.

**एकत्र कुटुंब पद्धतीचा खंबीर कणा**

आजच्या काळात जिथे विभक्त कुटुंब पद्धती वाढत चालली आहे, तिथे सौ. अंबिका पोतदार या एकत्र कुटुंब पद्धतीचा आदर्श वस्तुपाठ घालून देत आहेत. पोतदार कुटुंबात घरी वृद्ध सासू-सासरे आहेत. वाढत्या वयानुसार त्यांना लागणारी काळजी, त्यांची औषध-पाणी, वेळेवर जेवण आणि मानसिक आधार देणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी अंबिका यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. सासू-सासऱ्यांना स्वतःच्या आई-वडिलांप्रमाणे मानून त्यांच्या सेवेत त्या कोणतीही कमतरता पडू देत नाहीत. त्यांच्या या प्रेमळ आणि काळजीवाहू स्वभावामुळे संपूर्ण घर आनंदाने न्हाऊन निघाले आहे.

**मुलीच्या संगोपनात आदर्श माता**

सौ. अंबिका आणि श्री. किरण पोतदार यांना दोन गोड मुली आहेत. मोठी मुलगी कु. ईशानी ही सध्या इयत्ता तिसरीमध्ये शिकत आहे, तर लहान मुलगी कु. प्रीशा ही एल.के.जी. मध्ये शिकत आहे. मुलींच्या बालपणाला आणि त्यांच्या जडणघडणीला योग्य आकार देण्यासाठी सौ. अंबिका यांनी स्वतःला वाहून घेतले आहे. स्वतः उच्चशिक्षित असल्यामुळे त्या दोन्ही मुलींच्या अभ्यासाकडे वैयक्तिक आणि अत्यंत बारकाईने लक्ष देतात.

**त्याग, समर्पण आणि कर्तृत्वाचा संगम**

स्त्रीचे कर्तृत्व ती नोकरी करते की नाही यावरून ठरत नाही, तर ती दिलेल्या परिस्थितीत आपल्या कुटुंबाला किती उत्तम प्रकारे सांभाळते यावर ठरते. सौ. अंबिका यांनी एका बाजूला उच्च शिक्षणाची कास धरली तर दुसऱ्या बाजूला कौटुंबिक मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले.

माझी सून म्हणून मला तिचा विशेष अभिमान आहे. घरची लक्ष्मी जर सुशिक्षित आणि संस्कारी असेल, तर ती संपूर्ण घराचे नंदनवन करू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे सौ. अंबिका पोतदार!

नवरात्रीच्या या पावन पर्वावर घर आणि संसार अत्यंत समर्थपणे सांभाळणाऱ्या, कर्तव्याची आणि स्नेहाची मूर्ती असलेल्या या 'कर्तृत्वशील नवदुर्गेला' सोनार समाज संस्थेचा मानाचा मुजरा!

**– वसंत पोतदार, सोलापूर.**
**मोबा. ९४२३०६५९१५**

# कुशल तंत्रज्ञांवर निर्बंध

परदेशी कुशल कर्मचाऱ्यांना अमेरिकेत कायम निवासाचा परवाना मिळणे आता अधिक अवघड, खरे तर दुरापास्त होणार आहे. 'पर्मनंट लेबर सर्टिफिकेशन प्रोग्रॅम'(पर्म) या योजनेतून इन्फोसिस, टाटा कन्सल्टन्सी, विप्रो, एचसीएल, कॉग्निझंट, कॅपजेमिनी या कंपन्यांना वगळण्याचा निर्णय अमेरिकेचे कामगार मंत्री कीथ सॉंडरलिंग यांनी जाहीर केला आहे. आपण बोलावलेल्या परदेशी कामगारांना अमेरिकेत कायम निवासाचा परवाना मिळावा अशी मागणी अमेरिकन कंपन्या या योजनेतून करत असतात. सर्वसाधारणपणे एच-१ बी व्हिसाखाली हे कर्मचारी अमेरिकेत गेलेले असतात. मात्र आता ट्रम्प प्रशासनाच्या ताज्या निर्णयाने हा वाद आहे. त्याचा फटका कुशल कर्मचारी व त्यांच्या कुटुबीयांना बसणार आहे. आता एच-१ बी व्हिसाखाली आलेल्यांना कंपन्या नोकरी देऊ शकतात मात्र त्यांना दीर्घ काळ अमेरिकेत राहाण्याची शाश्वती या कंपन्या देऊ शकत नाहीत. त्यामुळे आहेत त्या कर्मचार्यांना टिकवणे कंपन्यांसाठीही अवघड होणार आहे. संबंधित काम करण्यास कोणीही अमेरिकन कामगार उपलब्ध नाही किंवा तो ते काम करण्यास उत्सुक नाही. परदेशी व्यक्तीस नेमल्याने अमेरिकन वेतनमान किंवा रोजगाराच्या शर्ती यांना धक्का बसणार नाही असे "पर्म'' योजनेनुसार त्या कंपनीस सरकार समोर सिद्ध करावे लागते. मूळच्या अमेरिकन व्यक्तींना रोजगार द्यावा अशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सक्ती ट्रम्प प्रशासन अलीकडे करत आहे. ताजे निर्बंध त्याचेच द्योतक आहे. कारवाईच्या भीतीने असेल पण अनेक भारतीय कंपन्यांनी या आधीच भारतीयांची संख्या कमी करून अमेरिकन नागरिकांना नोकरी देण्यास सुरुवात केली आहे. १ ऑक्टोबर २०२५ ते ३० जून २०२६ या काळात एचसीएलने ५९ व टीसीएसने केवळ दोन 'देशी' व्यक्तींना नोकरी दिली. त्यास 'सर्टिफाईड केसेस' म्हटले जाते. ट्रम्प प्रशासनाच्या ताज्या निर्णयाचा केंद्राने निषेध केला नाही. कुशल तंत्रज्ञ देशातच राहिले तर त्याचा स्टार्ट अप्सना फायदा होईल असे मत व्यापार मंत्री पियूष गोयल यांनी व्यक्त केले. हा सरकारचा दुबळेपणा मानावा लागेल. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री जेडी व्हान्स यांनी परदेशी कर्मचार्यांचा उल्लेख 'इन्डेंचर्ड सर्व्हंटस' असा अपमानास्पद रीतीने केला आहे. त्याचा अर्थ 'वेठबिगार' किंवा 'गुलाम' असा होतो. बहुसंख्याकवादी, वसाहतवादी दृष्टिकोन त्यातून स्पष्ट दिसतो. त्याबद्दल परराष्ट्र खात्याने व्हान्स यांचा निषेध केला ही समाधानाची बाब आहे. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार होणे किती अवघड आहे हे दोन उदाहरणांवरून दिसते. अमेरिकेस मोठे करणार्या परदेशी कुशल कर्मचार्यांवरच ट्रम्प निर्बंध आणत आहेत.




भारतातून अमेरिकेत जाऊ इच्छिणार्यांसाठी अमेरिकेचे दरवाजे जवळपास बंद झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान आणि अन्य तंत्र आधारित क्षेत्रांत काम करण्यासाठी भारतातून हजारो व्यक्ती अमेरिकेत जात असतात. त्यांना नोकरी देणार्या अमेरिकन कंपन्यांच्या सांगण्यावरून साधारण सहा वर्षांनी त्या व्यक्तीस 'ग्रीन कार्ड' मिळू शकते. ते मिळाल्यावर अमेरिकेत ती व्यक्ती कायम राहू शकते व नोकरी/ व्यवसाय करू शकते. ट्रम्प प्रशासनाच्या नव्या निर्णयाने अमेरिकेत असलेल्या हजारो भारतीयांना कायम निवासाचा परवाना मिळण्याबाबत शंका उपस्थित झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ट्रम्प 'मित्र' मानतात. पण प्रत्युत्तर शुल्क किंवा रशियाकडून तेल घेतल्याबद्दलचे दंडात्मक शुल्क असो किंवा व्हिसाचे निर्बंध असोत. ट्रम्प मैत्रीस किंमत देत नाहीत हे वारंवार दिसले आहे.

**अपमानास्पद टीका**

'मायक्रोसॉफ्ट' व 'अडोबे' या अमेरिकन कंपन्यांसह अन्यही अनेक कंपन्यांना ट्रम्प प्रशासनाने या योजनेतून वगळले आहे. व्हिसा योजनेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप यासाठी ट्रम्प प्रशासनाने केला आहे. अध्यक्षपदाच्या पहिल्या कारकिर्दीतही ट्रम्प यांनी तो केला होता. अमेरिकन नागरिकांचे रोजगार परदेशी व्यक्ती हिरावून घेतात हा त्यांचा जुना दावा प्रशासनाने पुन्हा केला आहे. स्थलांतरास असलेला विरोध ट्रम्प यांनी नव्या निर्णयाने पुन्हा व्यक्त केला आहे. कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मिळून सुमारे १० लाख भारतीय रोजगार आधारित ग्रीन कार्डची प्रतीक्षा करत आहेत. त्यांच्यासाठी अनिश्चितता वाढली आहे. ट्रम्प प्रशासन व कंपन्या यांच्यातील

# कातरवेळ

## मोरपीस-पूजा काळे

असेल काळाहाती मरणे, परि आमुच्या हाती जगणे. काळा एवढा उत्तम शिक्षक विरळचं असावा. सामान्यतः आयुष्यात खुणा पेरत आलेली सांजवेळ अटळ आणि अढळ असल्याने तिला न नाकारता झेलत स्वीकारणाचा पर्याय उत्तमचं मानावा लागेल. अर्थात परमेश्वर एकावेळी एकच सण देतो, तर दुसरा देण्यापूर्वी पहिला सण काढून घेतो असंच काहीसं कातर वेळेबाबत आहे. दिवसभर इथं तिथं नाचणाऱ्या, भुकेलेल्या, तहानलेल्या श्रमिकांच्या सावल्या सांजेच्या अंधारात गुडूप होतात, अंतर्मनात शोक निर्माण होतो, चर्र अशी उरातली धडधड, काळोख्या रात्रीला स्वच्छंदी स्वप्नांना आपल्या कुशीत घेऊन, कुणासाठी न थांबणारी तिन्हीसांज परतायला आतूर असते. पहाटेच्या प्रहरी आभाळ भरून येतं स्वप्नांनी. या स्वप्निल वाटेवर धावणं सोपं नसलं तरी हिंमत करून महत्त्वाकांक्षा उंची गाठते. इच्छापूर्तीचा व्यासंग निर्विघ्नपणे पार पडतो. पावलांना जोर चढतो. मी कोण? तू कोण? यात न पडता सिद्धी पूर्ततेसाठी जो तो झटतो अन् कामाच्या व्यापात झोकून देतो स्वत:ला. पोटासाठी कामाचं व्यसनचं जडतं. वेळेनुसार कामाची गणितं पाळली जातात. श्रमाला विश्रांतीची गरज असल्याने सायंकाळी घर खुणावू लागतं. प्रपंचाचे दरवाजे बोलावू लागतात, कुटुंबाचं सुख डोळ्यांसमोर तरळू लागतं. कामाच्या व्यतिरिक्त कक्षेबाहेर केलेला विचार सांजवेळी मनात येतो. मनुष्यगण पशूपक्ष्यांच्या परतीच्या वेळा नियमित असल्याने आसमंतास वेळेची चाहूल लागते आणि शांत शांत पावलांनी काव्ऱ्या बावऱ्या उदासवाण्या चित्ताने चालत येते कातरवेळ!

क्षितीजावर केंद्रित झालेले धुंद मन अंतर्मनात आठवणी घेऊन व्याकुळ होते. काही स्वप्न पूर्णत्वास जातात, आनंद देतात, तर काही मनोदशेतल्या मैलांचे अंतर कापत अदृश्य सीमारेषेला स्पर्श करतात. वेळ सरल्याची ही ओढ कुठून येते? रम्य पहाटेला खुणावणारी सांजवेळ का थरथरते? काय मागणं असतं तिचं? हृदयाजवळचा निनावी शोध सुटत नाही. बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको, यातायात संपत नाही. तिथं पोहोचेस्तोवर कुणाचे पडसाद नसतात, ना कुणाचा मागमूस ना सीमेवर पोहोचण्याचं समाधान असतं. मोकळं रान, डांबरी रस्ते, सुसाट वळती घराकडे, कातरवेळी मन हुरहुरते वेग घेई वाटेकडे. वाईट साईट विचारी इंगळ्यांचे डसणारे वेदनादायी सूर लागता, घायाळ अवस्थेतील जेरबंद व्याकुळल्या मनाला आवरण्याची आणि आवरलेल्या भाव भावनांना सावरण्याची साधून आलेली वेळ कातरवेळ होऊ पाहते. नि:शब्द जड पावलांनी संध्या येऊ लागता, सांजदिशा मंदगतीने अंधारू लागतात. पलीकडे क्षितीजावरच्या साध्या बहुसंख्य रेषा मावळत्या रंगांनी भरून आलेल्या असताना त्याकडे पाहताच गलबलून उठतं, वातावरणात भरलेली जगावेगळी ओढ नकळत खेचत राहते. आभाळातून कुणीतरी आर्त साद घालावी आणि त्या हृदयस्पर्शी हाकेला आपण प्रतिसाद द्यावा पण तो तिथपर्यंत पोहोचू नये अशी केविलवाणी अवस्था होते. त्या वेळची मनातली कालवाकालव अन् जीवाची घालमेल म्हणजे कातरवेळ असते. प्रकाशाकडून अंधाराच्या वाटेवर एका दृष्टिक्षेपात मावणारं निसर्गाचं अद्भुत सौंदर्य, रंगबिरंगी रानफुलं, वाऱ्याच्या झोतावर मुरडणारी नाजूक लवलवती पाती, डेरेदार वृक्षावर संसार थाटलेली पाखरं, शहरात, वस्त्यांवर, आडमुठ्या वळणाशी दोन पायांवर चालणारी आया बाया, मुलं, माणसं धूसर होतात. केवळ अस्तित्वाचे भास मानत राहायचे. समयी घटिकेचे अंधाराला एकचं मागणे असते की, हे मळभ दूर सार आणि प्रकाशास अधिक तेजोमय कर. पूर्ण दिवसात तसूभरही बदल झाला नसल्याने निरागस झाडं, पानं, फुलं उदास वाटतात. सारा आसमंत निपचित पडल्यासारखा भासतो. माणसांचे थवेच्या थवे रस्त्यावर आक्रमण करतात. पांथस्थ होतात. निर्मितीला रंगाचे धुमारे फुटत नाहीत. फुलांचा रंगगंधाचा मोह सरतो. सुगंधी दरवळ वाऱ्याला मोहवत नाही, सारं असूनही मन कशात रमत नाही. बोलघेवड्या अबोलतेला कवच फोडता येत नसल्याने आठवणींनी मन गाभारा भरून येतो. अधूरेपणाची सल कातरत जाते. दारामागचा आक्रोश ऐकू न आल्याने, मनाची कवाडं मिटली जातात अन् परतीच्या प्रवासात सोबत करणारी कुणाची तरी आठवण बैचेन करते. डोळ्यांदेखत विरत जाणारी कृष्णधवल रंगीत दिवास्वप्नांची लकेर तरंग उठवत नाही. मन सैरभैर करणारी कातरवेळचं असते. अस्तित्वाचे सारे रंग होती गगनात दंग, हा कातरवेळचा खेळ चाले मनात जनात. कुणीतरी म्हटलेल आहेच की, आतल्या आत शब्दाचा भार आसवांचा पाऊस, झाकोळलेल्या आशा अपेक्षा सारं काही नि:शब्द, निपचित तरी कवाडावरची थाप तसंच बंद दारावरची टकटक ऐकण्यासाठी मनाच्या सांदी कोपऱ्यात अधिक आतूर अधिरलेली संवेदना वाट पाहत असते. ही टकटक नुसत्या आवाजावरून ओळखता येते. प्रतीक्षेची पूर्तता होणं अथवा न होणं ही त्या टकटकीची चाहूल सांगते. आज जानेकी जीद ना करो म्हणणारी सांज कातरवेळ मनपूर्तीचं समाधान देताना... कधी खुलते, तर कधी प्रतीक्षेची नुसती हुरहूर लावून जाते. खत्म नहीं होती कुछ बातें कुछ मुलाकाते. खत्म नहीं होते कुछ अच्छे पल, कुछ खुशिया. खत्म नहीं होती कुछ गलिया कुछ शाम के अंधियारे पल... खत्म नहीं होते... खत्म नहीं होते...!



## Doctor Tips १ सल्ला डॉक्टरचा



● जोडीदाराबरोबर सहवास ब्लड प्रेशर कमी करतो नवीन संशोधनानुसार सहवास आणि ब्लड प्रेशरचं आपआपसात एक संबंध असतो, सहवास ब्लड़ प्रेशर संतुलित करतं, ब्लड़ प्रेशर कमी करण्यात सहवासाची महत्वाची भूमिका असते. ● जोडीदाराबरोबर सहवास एक सर्वोत्तम व्यायाम व्यायाम आणि सेक्स हे एकमेकांसाठी पूरक मानले जातात, व्यायामाने तुम्हाला उत्साहीत वाटतं, तर सहवास तन-मनचा उत्साह वाढवण्यास मदत करतो. चांगल्या सहवासाठी सकारात्म विचार महत्वाचा आहे. सहवास एका प्रकारे तुमच्या शरीरात, सकारात्मक विचार रूजवतो. सहवासमुळे मिनिटाला पाच कॅलरीज बर्न होतात. यामुळे रोगाची प्रतिकारशक्ती वाढते, आणि तुमच्या आजारी पडण्याचं प्रमाण कमी होत जातं.

## Joke २ विनोद




बंड्या उदास बसला होता. खंड्याने त्याला विचारले काय झालं रे? बंड्या म्हणाला. मी क्रिकेट कॉमेंट्रिमुळे ऑफिसातून सस्पेंड झालो. खंड्या सहानभुती दर्शवित म्हणाला अरे पण ऑफिसात कॉमेंट्री कशाला ऐकायची? अरे बाबा, ऐकत नव्हतो म्हणून तर सस्पेंड झालोय. बॉसने जेव्हा स्कोअर विचारला तेव्हा मी हेडफोनवर गाणी ऐकत होतो ना.

## Message ३ संदेश




Apki Ada,
Apki Smile,
Apka Chehra,
Apka Chalna,
Apka Bolna,
Apka Sharmana,
Apki Julfein,
Apki Aankhen,
Apka Andaz....
Uff Koi 1 Cheez To Tarif K Kabil Hoti...

## Thought ४ सुविचार



ज्याच्या जीवनामध्ये निश्चित ध्येय नसते त्यालाच वेळ घालविण्यासाठी साधन शोधण्याची गरज भासते.

**संस्कृत सुभाषित**

**प्राज्ञोपसेविनं वैद्यं धार्मिकं प्रियदर्शिनम्।**
**मित्रवन्तं सुवाक्यं च सुहृदं परिपालयेत्।।**

अर्थ - विद्वानांची सेवा करणारा, धार्मिक वर्तन करणारा, ज्याचे दर्शन प्रिय असते असा, मधुर बोलणारा, दयाबुद्धी बाळगणारा असा वैद्य असावा.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. दडपण, वजन
३. आकाशाला भेदणारा आवाज इत्यादी
८. गंध
१०. भ्रम
१२. बर्फाचा पर्वत
१४. गरजू
१६. रानात जाणारा रस्ता
१८. वाकबगार, निपुण
२०. साप
२१. गाढव
२२. जिवंत
२४. घरातील मोठी माणसे
२६. मोठी बहीण
२७. शेंगेवरील आवरण, फोलपट
२९. खुंटी, मेख
३०. पंख
३२. उत्तराधिकारी
३३. जन्म-मृत्यू
३५. फोडातील द्रव
३७. मधली बहीण
३८. रुचीहीन, बेचव
४०. उथळ मोठी वाटी
४१. राजवाडा
४२. प्रत्युत्तर
४३. इक्षुदंड, यापासून साखर बनवितात
४४. शूर
४५. खण पण कापड नव्हे
४६. श्रेष्ठ पुरुष
४९. कजाग स्त्री, आदिमाया
५१. सोन्याचे शिवकालीन नाणे
५३. हात
५५. तिरळा, काणा
५६अ. सत्त्व
५७. प्रताप, विक्रम
५९. प्रेत
६१. कलावंत
६३. मोठी जाड सतरंजी
६४. झाड
६५. चटकन रागावणारा
६६. काळ्या पाठीचे हरिण
६९. मुंबईतील एक उपनगर
७२. व्यवस्था, उद्योग
७३. समानता
७४. पेन-पन्सिलीची पेटी
७७. परिस्थिती
७८. झाडाची त्वचा
७९. पुरणाची आमटी, कोल्हापुरी मिसळीतील रस्सा
८०. पाटलाचे काम

### उभे शब्द

२. पूर्ण बहिरा
३. चुकीचे (हिंदी)
४. क्षमा, दुर्लक्ष
५. चीर, फट
६. नवऱ्याचा भाऊ
७. मित्र, सोबती
९. एकूणात प्रमाण
१०. किंमत
११. पाचवीला पुजली जाणारी
१३. कापड विणण्याचे साधन
१५. पशू
१७. आकाश
१९. मूळ आधार
२१. कृष्णसखी
२२. मिठाई तयार करणारा
२३. तपासणी करणारा
२५. बारीकसारीक
२६. तारणारा
२८. काढलेली सुट्टी
३०. अत्युच्च लष्करी बहुमान
३१. पांढरे केस लपवणारा
३४. अभिनेता
३६. खुंट, आंचळ
३७. संमोहित करणारे सौंदर्य
३९. मदतनीस
४७. मोजकेपणा, मितता
४८. सरस्वतीच्या जवळील वाद्य
४९. भ्रमर, भुंगा
५०. माणुसकी
५२. नकला करणारा
५४. धपाटा
५६. न्यूनता
५६ब. प्रभात
५८. सज्जनगडचे संत
६०. मऊ पदार्थाचा आघात
६२. दही घुसळण्याचे साधन
६६. फळावरील साल
६८. रायगडावरील एक कडा
७०. धमकी
७१. पवित्र, शुद्ध
७४. मनाचा ओढा
७५. घट्ट, धन
७६. शिल्लक राहिलेली रक्कम

### आडवे उत्तर

१.दाब ३.गगनभेदी ८.वास १०.भास १२.हिमालय १४.गरजवंत १६.रानवट १८.पारंगत २०.नाग २१.रासभ २२.हयात २४.वडीलधारी २६.ताई २७.टरफल २९.पाचर ३०.पर ३२.वारस ३३.जननमरण ३५.लस ३७.माई ३८.नीरस ४०.सट ४१.महाल ४२.पडसाद ४३.ऊस ४४.वीर ४५.कप्पा ४६.नरवर ४९.महामाता ५१.होन ५३.कर ५५.चकणा ५६अ.कस ५७.पराक्रम ५९.कलेवर ६१.कलाकार ६३.जाजम ६४.तरु ६५.तापट ६७.काळवीट ६९.दादर ७२.कारभार ७३.समता ७४.कलमदान ७७.हालहवाल ७८.साल ७९.कट ८०.पाटीलकी

### उभे उत्तर

२.बहिरभट ३.गलत ४.गय ५.भेग ६.दीर ७.सवंगडी ९.सरासरी १०.भाव ११.सटवाई १३.माग १५.जनावर १७.नभ १९.पाया २१.राधा २२.हलवाई २३.तपासनीस २५.लहानसहान २६.तारणहार २८.रजा ३०.परमवीरचक्र ३१.कलप ३४.नट ३६.सड ३७.मादकता ३९.सहायक ४७.रजपज ४८.वीणा ४९.मधुकर ५०.मानवता ५२.नकलाकार ५४.रट्टा ५६.कमतरता ५६ब.सकाळ ५८.रामदास ६०.रपका ६२.रवी ६६.टरफल ६८.टकमक ७०.दमदाटी ७१.मंगल ७४.कल ७५.दाट ७६.बाकी



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### शुबमन गिलने आयसीसीचा मानाचा पुरस्कार जिंकत इतिहास घडवला!

मुंबई–शुबमन गिलने ऐतिहासिक कामगिरी करत मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. शुबमन गिलसाठी २०२६ हे वर्ष कमालीचं ठरलं. त्याने यंदा दोन्ही फॉरमॅटमध्ये धावांचा पाऊस पाडत प्रत्येक मालिकेत आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. दरम्यान सप्टेंबर महिन्यातही त्याने हीच लय कायम ठेवली आणि त्याच्या या कामगिरीची दखल आयसीसीने घेतली आहे. आयसीसीच्या सप्टेंबर महिन्याचा प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार शुबमन गिलला देण्यात आला आहे.आपल्या उत्कृष्ट काम गिरीच्या बळावर, त्याने सप्टेंबर महिन्याचा प्रतिष्ठित आयसीसी पुरस्कार जिंकण्यात यश मिळवलं आहे. या पुरस्कारासाठी नामांकित झालेले त्याचे सहकारी अभिषेक शर्मा आणि झिम्बाब्वेचा स्टार खेळाडू सिकंदर रझा यांना त्याने मागे टाकलं. तसेच, हा पुरस्कार पाच वेळा जिंकणारा शुबमन गिल पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. सप्टेंबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली होती.

शुबमन गिलची सप्टेंबर महिन्यासाठी मआयसीसी प्लेयर ऑफ द मंथफम्हणून निवड करण्यात आली आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांत एकदिवसीय मालिका खेळली गेली; यातील पहिले दोन सामने सप्टेंबरमध्ये झाले आणि गिलने त्या सामन्यांमध्ये ३३३ धावांचा डोंगर उभा करत जबरदस्त कामगिरी केली. पहिल्या सामन्यात गिलने ११० धावांची शानदार खेळी केली, तर दुसऱ्या सामन्यात त्याने नाबाद २२३ धावा केल्या. मात्र, ऑक्टोबरमध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या सामन्यात केवळ एक धाव काढून तो बाद झाला.

### शफाली वर्माने दुसऱ्यांदा पटकावला पुरस्कार

मुंबई–वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत शानदार कामगिरी केल्यानंतर भारतीय कर्णधार शुभमन गिलनं पाचव्यांदा मआयसीसी प्लेयर ऑफ द मंथफपुरस्कार पटकावला आहे. त्याच वेळी, सलामीवीर शफाली वर्मानं आशिया कप आणि आशियाई क्रीडा स्पर्धामधील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर हा पुरस्कार दुसऱ्यांदा जिंकला. एकाच क्रिकेट मंडळाच्या (बोर्डाच्या) खेळाडूंनी हे दोन्ही पुरस्कार जिंकण्याची ही पाचवी वेळ आहे आणि भारतासाठी ही तिसरी वेळ आहे.

अंतिम यादीत असलेली इतर महत्त्वाची नावे: पुरुष गटात भारताचा अभिषेक शर्मा आणि झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा यांचा समावेश होता. महिला गटात श्रीलंकेची कर्णधार चमारी अथापथू आणि भारताची डावखुरी फिरकीपटू श्री चरणी यांचा विचार करण्यात आला होता. यापूर्वी जसप्रीत बुमराह आणि स्मृती मानधना (जून २०२४), तसंच अभिषेक शर्मा आणि स्मृती मानधना (सप्टेंबर २०२५) यांनी हा दुहेरी सन्मान मिळवला होता.

गिलचा विक्रम : वेस्ट इंडिजची कर्णधार हेली मॅथ्यूज ही एकमेव अशी दुसरी खेळाडू आहे, जिनं हा पुरस्कार पाच वेळा जिंकला आहे. गिलनं यापूर्वी जानेवारी आणि सप्टेंबर २०२३, तसंच फेब्रुवारी आणि जुलै २०२५ मध्ये हा पुरस्कार जिंकला होता. तिरुवनंतपुरममधील पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने ११० धावांची शानदार खेळी केली. त्यानंतर, त्यानं १३३ चेंडूत २२३ धावा करत वेगवान द्विशतक झळकावलं होतं. भारतानं ४०६ धावांचं प्रचंड लक्ष्य आठ गडी आणि ३९ चेंडू राखून यशस्वीपणे गाठलं होतं. पुरस्कार मिळाल्याचा आनंद: गिल म्हणाला, मफ्पाचव्यांदा हा पुरस्कार मिळाल्याचा मला आनंद आहे.

### मुंबईची विजयी सलामी; चंदीगडला डावाने हरवत बोनस गुणांची कमाई

मुंबई–रणजी ट्रॉफीच्या एलिट गट मडीफमधील सलामीच्या सामन्यात गतविजेत्या मुंबई संघाने चंदीगडविरुद्ध धमाकेदार विजयाची नोंद केली आहे. वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात मुंबईने चंदीगडचा एक डाव आणि १५५ धावांनी पराभव करत स्पर्धेत बोनस गुणांसह विजयी शुरुआत केली.तीन दिवसांतच सामना संपवला मुंबईने हा सामना अवघ्या तीन दिवसांत आपल्या नावावर केला. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी चंदीगडच्या दुसऱ्या डावात फलंदाजांनी काहीसा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. अर्जुन आझ–ादने अर्धशतक झळकावले, तर पाचव्या क्रम ांकावर फलंदाजी करणाऱ्या शिवम भामरीने ४४ धावांचे योगदान दिले. मात्र, मुंबईच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर पाहुण्या संघाचा निभाव ला–गला नाही आणि संपूर्ण संघ दुसऱ्या डावात ५२.१ षटकांत १९६ धावांवर बाद झाला. मुंबईकडून शम्स मुलानी आणि तनुष कोटियन यांनी प्रत्येकी ३ बळी टिपले.

क्षेत्ररक्षणातील चुकांची चिंता कायम मोठ्या फरकाने विजय मिळवला असला, तरी मुंबईच्या क्षेत्ररक्षणाचा दर्जा पूर्णपणे निर्दोष नव्हता. रणजी ट्रॉफीच्या एलिट गट मडीफमधील सलामीच्या सामन्यात गतविजेत्या मुंबई संघाने चंदीगडविरुद्ध धमाकेदार विजयाची नोंद केली आहे. वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात मुंबईने चंदीगडचा एक डाव आणि १५५ धावांनी पराभव करत स्पर्धेत बोनस गुणांसह विजयी शुरुआत केली.

# अफगाणिस्तानचे मिशन फत्ते

## १४२ षटकांची चिवट झुंझ देत रोखला पराभव






दिल्ली–चौथ्या डावात ४७९ धावांचे प्रचंड लक्ष्य मिळालेल्या अफगाणिस्तानचा बांगलादेशविरुध्द पराभव अटळ होता. पण दीड दिवस १४२ षटकांचा चिवट प्रतिकार करत त्यांनी पराभवाला रोखलं.

अफगाणिस्तानने ४८९ धावांचा पाठलाग करताना चौथ्या डावात ३४६८ अशी मजल मारली आणि सामना अनिर्णित राखला. सेदिउल्ला अटलने ३३२ चेंडूंमध्ये १११ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. कर्णधार रहमत शाहने १२४ चेंडूत ५१ तर क्वैस अहमदने ८० चेंडूत नाबाद ४९ धावांची खेळी करत पराभव टाळला.

बांगलादेशने पहिल्या डावात ३४६ धावांची मजल मारली होती. शादमन इस्लाम, तांझिड हसन आणि लिट्टन दास यांनी अर्धशतकी खेळी केल्या.

अफगाणिस्तानतर्फे मोहम्मद सलीमने ४ तर यामिनझाईने ३ विकेट्स घेतल्या.

कर्णधार म्हणून पहिल्याच लढतीत रहमत शाहने नाबाद १०५ धावांची खेळी केली. अब्दुल मलिकने ६२ धावा करत त्याला चांगली साथ दिली. मात्र बाकी फलंदाजांना मोठी खेळी करण्यात अपयश आलं. बांगलादेशकडून हसन महमूदने हॅट्रिटकसह ५ विकेट्स घेतल्या. इबादत होसेनने ४ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. बांगलादेशने १०६ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळवली. बांगलादेशने दुसरा डाव ३७२ धावांवर घोषित केला. लिट्टन दासने आक्रमक शतकी खेळी साकारली. नजमुल हसन शंटोने ८२ धावा करत त्याला चांगली साथ दिली. बांगलादेशने अफगाणिस्तानला ४७९ धावांचं प्रचंड लक्ष्य दिलं. फिरकीला अनुकूल खेळपट्टीवर अफगाणिस्तानचा संघ झटपट गाशा गुंडाळेल असं स्थिती होती पण त्यांनी चिवट झुंज दिली.

सेदिउल्ला अटल हा चौथ्या डावात शतक झळकावणारा अफगाणिस्तानचा पहिलाच फलंदाज ठरला. कर्णधार रहमत शाहने पहिल्या डावातील फॉर्म कायम राखत अर्धशतक झळकावलं. १४२ षटकं खेळून काढत अफगाणिस्तानने अटळ वाटणारा पराभव थोपवला.

बांगलादेशतर्फे मेहदी हसन मिराझ आणि इबादत होसेन यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. या एकमेव कसोटीनंतर युएई, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांच्यात तिरंगी वनडे मालिका होणार आहे.

# ऑस्ट्रेलियाने दक्षिण अफ्रिकेला पहिल्या कसोटीत २१४ धावांनी नमवलं



## टीम इंडियाला असा होणार फायदा

दिल्ली–ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना डरबनच्या किंग्समीड मैदानात पार पडला. हा सामना ऑस्ट्रेलियाने २१४ धावांनी जिंकला आहे. यासह वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२७ स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी दावा पक्का केला. तर या पराभवामुळे दक्षिण अफ्रिकेला फटका तर भराताला फायदा होणार आहे. पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम फलंदाजी स्वीकारली. हा निर्णय ऑस्ट्रेलियाच्या पथ्यावर पडला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३९० धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण अफ्रिकन संघाने २८४ धावांपर्यंत मजल मारली. त्यामुळे पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाला १०६ धावांची मजबूत आघाडी मिळाली. या आघाडीसह ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात ३१४ धावा केल्या आणि ४ विकेट हाती असताना डाव घोषित केला. यासह दक्षिण अफ्रिकेसमोर विजयासाठी ४२० धावांचं आव्हान ठेवलं. हे आव्हान गाठताना दक्षिण अफ्रिकेचा संघ २०६ धावा करू शकला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने २१४ धावांनी विजय मिळवला. दक्षिण अफ्रिकेला बसला फटका ऑस्ट्रेलिया विरुद्धचा सामना होण्यापूर्वी आणि दक्षिण अफ्रिका संघ गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. मात्र या सामन्यातील निकाल लागला आणि दक्षिण अफ्रिकेला फटका बसला आहे. दक्षिण अफ्रिकन संघाची तिसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे. तर न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या स्थानावर विराजमान झाला आहे. या सामन्यापूर्वी दक्षिण अफ्रिकेची विजयी टक्केवारी ही ७५ टक्के होती. मात्र पराभव होताच विजयी टक्केवारी घटली असून ती ६० टक्के झाली आहे. तर न्यूझीलंडची विजयी टक्केवारी ७२ असल्याने दुसऱ्या स्थानावर विराजमान झाले आहेत. ऑस्ट्रेलियाने ११ सामने खेळले असून ९ सामन्यात विजय आणि २ सामन्यात पराभवाचं तोंड पाहिलं आहे. यासह विजयी टक्केवारी ही ८१.८२ इतकी झाली आहे.

भारताला टॉप दोन पैकी पहिल्या स्थानावर जागा मिळवणं खूपच कठीण आहे. मात्र दुसऱ्या स्थानावर जागा मिळवू शकतात. यासाठी गुणतालिकेत पुढे असलेल्या न्यूझीलंड, दक्षिण अफ्रिका आणि ांगलादेशचा पराभव झाला, तर पथ्यावर पडेल. : या पराभवामुळे दक्षिण आफ्रिका (६०म) आता भारताच्या (५१.५२म) अधिक जवळ आली आहे. जर दक्षिण आफ्रिकेने हा सामना जिंकला असता, तर ते ७५म किंवा त्याहून अधिक गुणांसह भारतापेक्षा खूप पुढे निघून गेले असते.ऑस्ट्रेलिया (८१.८२म) मजबूत स्थितीत आहे. असं असलं तरी न्यूझीलंड (७२.२२म), दक्षिण आफ्रिका (६०म), बांगलादेश (५५.५६म) आणि भारत (५१.५२म) यांच्यात दुसऱ्या स्थानासाठीची स्पर्धा आता अत्यंत चुरशीची झाली आहे.

# भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा; हरमनप्रीत सिंगकडे कर्णधारपद!

नवी दिल्ली–हॉकी इंडियाने 'आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी पंजाब २०२६' साठी भारतीय पुरुष हॉकी संघाची अधिकृत घोषणा केली आहे. आगामी २७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान पंजाबमधील जालंधर आणि मोहाली येथे ही स्पर्धा रंगणार आहे. जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत भार–ताला ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून देत विजेतेपद यशस्–वीपणे राखणाऱ्या मुख्य संघावरच निवड समितीने पुन्हा एकदा विश्वास दाखवला असून, संघाचे नेतृत्व स्टार वीरस–षश्रळलज्ञ–शी हरमनप्रीत सिंग याच्याकडेच सोपवण्यात आले आहे.

मायदेशात आशियातील आघाडीच्या हॉकी संघांशी सामना करण्यासाठी संघात मोठे बदल न करता सातत्य राखण्यावर भर देण्यात आला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत यश मिळवून देण–ारा बहुतांश संघ कायम ठेवण्यात आला आहे. गोलकीपर कृष्ण बहादूर ठाकूर याचे संघात दम दार पुनरागमन झाले आहे, तर युवा डिफेंडर अमनदीप लाक्रा आणि मिडफिल्डर आदित्य अर्जुन लालागे यांना वरिष्ठ संघात स्वत:चे स्थान बळकट करण्याची आणखी एक सुवर्णसंधी मिळाली आहे. याशिवाय, १८ सदस्यांच्या मुख्य संघाव्यतिरिक्त मिडफिल्डर विष्णू कांत सिंग आणि फॉरवर्ड अंगद बीर सिंग यांना राखीव खेळाडू म्हणून स्थान देण्यात आले आहे.भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी आनंद व्यक्त करत म्हणाले की, ''पंजाबमध्ये आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणे ही अत्यंत विशेष बाब असेल. या संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंचा सुरेख संगम पाहायला मिळतो. मायदेशातील प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या ऊर्जेचा आणि पाठिंब्याचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. भारतात स्पर्धा खेळण्यासारखा दु–सरा आनंद नाही आणि या वाता–वरणाची आम्हाला नक्कीच उणीव भासत होती.''ही स्पर्धा भारतीय हॉकीसाठी विशेष महत्त्वाची ठरत आहे, कारण याद्वारे पंजाबमध्ये आंतरराष्ट्रीय हॉकीचे शानदार पुनरागमन होत आहे. पंजाबने भारतीय हॉकीला मोठे योगद–ान दिले असून अनेक पिढ्यांचे दिग्गज खेळाडू या राज्याने देशाला दिले आहेत.

# सिराजच्या संघाचा मोठा पराक्रम! तनय त्यागराजनच्या ९ विकेट्स, त्रिपुराचा पराभव



हैदराबाद–रणजी ट्रॉफी २०२६–२७ च्या हंगामाची सुरुवात हैदराबाद संघाने अत्यंत दणदणीत आणि शानदार पद्धतीने केली आहे. स्टार वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज याच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या हैदराबादने त्रिपुराचा एक डाव आणि ४० धावांनी दारूण पराभव केला. या विजयासह हैदराबादने नव्या हंगामात आपली मजबूत दावेदारी सिद्ध केली आहे.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी मंगळवारी त्रिपुराचा संघ पुढे खेळण्यासाठी उतरला. दुसऱ्या दिवशी त्यांची धावसंख्या १०७ धावांवर ७ गडी बाद अशी बिकट होती. आजच्या सत्रात हैदराबादच्या गोलंदाजांनी उर्वरित फलंदाजांना अगदी कमी वेळात बाद केले. त्रिपुराचा संपूर्ण संघ दुसऱ्या डावात अवघ्या १२० धावांवर ऑलआऊट झाला. यादरम्यान त्रिपुराने केवळ ६.२ षटकांत आपल्या अखेरच्या ३ विकेट्स गमावल्या.

या सामन्याच्या विजयाचा खरा हिरो डावखुरा फिरकी गोलंदाज तनय त्यागराजन ठरला. त्याने आपल्या फिरकीच्या जाळ्यात त्रिपुराच्या फलंदाजांना अडकवत सामन्यात एकूण ९ बळी टिपले. पहिल्या डावात त्रिपुराचा डाव १३४ धावांवर संपुष्टात आला होता, ज्यामध्ये हैदराबादने प्रत्युत्तरात पहिल्या डावात २९४ धावा करून मोठी आघाडी घेतली होती. दुसऱ्या डावात तनय त्यागराजनने तब्बल ६ विकेट्स घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. कर्णधार मोहम्मद सिराजने पहिल्या डावात कोणतीही विकेट घेतली नसली, तरी दुसऱ्या डावात कडक मारा करत २ महत्त्व–ाचे फलंदाज बाद केले. याशिवाय, हैदराबादच्या पहिल्या डावात तन्मय अग्रवाल आणि पदार्पण करणारा फलंदाज रुथिक यादव यांनी झळकावलेली अर्धशतके संघासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली. शेवटच्या सत्रात सेंटू सरकार आणि परवेझ सुलतान यांनी काही वेळ संघर्ष केला, परंतु तो अपुरा ठरला.

या दणदणीत विजयामुळे हैदराबाद संघाने रणजी करंडक स्पर्धेच्या नव्या हंगामात आपले मनसुबे स्पष्ट केले असून आगामी सामन्यांसाठी आपला आत्मविश्वास उंचावला आहे.

# पाकिस्तानी खेळाडूंबरोबर नाव दाखवल्याने शिखर धवन संतप्त; कायदेशीर कारवाई करणार



नवी दिल्ली–टीम इंडियाचा माजी सलामीवीर शिखर धवनने त्याचं नाव पाकिस्तानच्या खेळाडूंबरोबर घेतल्याने वर्ल्ड टी२० कॉन्टिनंट स्पर्धेच्या संयोजकांविरुद्ध कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये शिखरने यासंदर्भात माहिती दिली आहे. चाहत्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये आणि चुकीच्या बातम्या पसरवू नये अशी विनंती त्याने केली आहे.

शिखर या स्पर्धेत एशिया वॉरियर्स संघाकडून खेळणार आहे असं पोस्टमध्ये म्हटलं होतं. या संघात पाकिस्तानचेही खेळाडू आहेत. या स्पर्धेशी कोणताही संबंध नाही आणि यात खेळत नसल्याचं धवनने म्हटलं आहे. 'वर्ल्ड टी२० कॉन्टिनंट कप स्पर्धेत नाव असल्याचं माझ्या निदर्शनास आलं. मला माहिती किंवा कल्पना देता संयोजकांनी मी या स्पर्धेत खेळणार असल्याचं म्हटलं आहे. माझे विधि सल्लागार यासंदर्भात संयोजकांवर कारवाई करतील. प्रसारमाध्यमांना आणि चाहत्यांना विनंती आहे की त्यांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये. चुकीच्या माहितीवर आधारित वृत्तांकन करू नये. तुमच्या सदोदित पाठिंब्यासाठी मनापासून ऋणी आहे', असं धवनने म्हटलं आहे.

दरम्यान शिखर धवनसह एशिया वॉरियर्स संघात राहुल शर्मा, गुरकीरत सिंग मान, अभिमन्यू मिथुन यांचंही नाव होतं. एशिया वॉरियर्सच्या २४ सदस्यीय संघात सोहेल तन्वीर, इफ्तिकार अहमद, मुहम्मद इम्रान खान या पाकिस्तानच्या माजी खेळाडूंचा समावेश आहे. धवनचं नाव पाकिस्तानच्या खेळाडूंबरोबर दाखवण्यात आल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं. या संघात उपुल थारंगा, दिमुथ करुणारत्ने, दिलहारा लोकुटिगे, निसला गमागे, लहिरु थिरिमाना, रुबेल हुसेन, महमदुल्ला रियाझ, इम्रूल केयस, सूरज कुमार, समीउल्ला शिनवारी, सोहेब मकसूद, अविष्का परेरा, उस्मान कादीर यांचा समावेश आहे. श्रीलंकेचे माजी कर्णधार मर्वन अट्टापट्टू या संघाचे प्रशिक्षक तर सुमीत राणा सहाय्यक प्रशिक्षक आहेत.

भारत पाकिस्तान संबंधासंदर्भात धवनने नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे. पुलवामा हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक केला होता. त्यावेळी शिखर व्यक्त झाला होता. 'भारताने दहशतवादाविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. भारत माता की जय', असं धवनने लिहिलं होतं. आणखी एका पोस्टमध्ये धवनने पाकिस्तानच्या दहशतवादाला खतपाणी घालण्याच्या भूमिकेवर जोरदार टीका केली होती.

## लातूर येथे महिला किसान दिवस निमित्त १५ ऑक्टोबरला जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

***महिला शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन***

**लातूर/प्रतिनिधी:** संयुक्त राष्ट्रांनी सन २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांचे कृषी, अन्नसुरक्षा, ग्रामीण उपजीविका आणि शाश्वत विकासातील अमूल्य योगदान अधोरेखित करणे, तसेच त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण करण्याच्या मुख्य उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १५ ऑक्टोबर हा दिवस 'महिला किसान दिवस' म्हणून साजरा केला जात आहे.

त्याच अनुषंगाने लातूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथे जिल्हास्तरावर गुरुवारी, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'महिला किसान दिवस - २०२६' निमित्त एक दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत महिला शेतकऱ्यांनी स्वतः विकसित केलेले किंवा स्वीकारलेले स्थानिक कृषी तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण शेती पद्धती, आधुनिक कृषी अवजारे, जैविक निविष्ठा, फेरोमेन ट्रॅप्स (कामगंध सापळे), आणि हवामान बदलास अनुकूल असणारे विविध तंत्रज्ञान यांचे प्रात्यक्षिक व प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. यासोबतच जिल्ह्यातील तालुक्यातील प्रगतशील महिला शेतकऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा गुणगौरवही केला जाणार आहे.

तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला शेतकरी, शेतकरी गटांमधील महिला सदस्य आणि प्रगतशील महिला शेतकऱ्यांनी या जिल्हास्तरीय कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यशाळा व प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'आत्मा' प्रकल्पाच्या संचालक मनिषा उ. बांगर यांनी केले.

# स्टॅनफोर्डच्या जागतिक 'टॉप २% शास्त्रज्ञांच्या यादीत प्रा.डॉ.विश्वनाथ मोटे यांची सलग सहाव्या वर्षी झेप!

### मटेरियल्स सायन्स क्षेत्रात जागतिक स्तरावर ३,३०,८९६ संशोधकांमधून ३,९१० वे स्थान; दयानंद विज्ञान महाविद्यालयासह महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद शिक्षण संस्था संचालित, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील भौतिकशास्त्राचे संशोधक प्रा.डॉ. विश्वनाथ डी. मोटे यांनी जागतिक संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकाशन संस्था एल्सेव्हिअर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जगातील अव्वल दोन टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत त्यांचा २०२१ ते २०२६ या सलग सहा वर्षांसाठी समावेश झाला आहे. विशेष म्हणजे, मटेरियल्स सायन्स या संशोधन क्षेत्रात जगभरातील ३,३०,८९६ संशोधकांमधून त्यांनी ३,९१० वे स्थान मिळविले आहे.

त्यांच्या या यशामुळे दयानंद शिक्षण संस्था, दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि लातूर जिल्हा व महाराष्ट्राच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्राच्या नावलौकिकात भर पडली आहे.स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि एल्सेव्हिअर यांच्या सहकार्याने प्रसिद्ध होणारी ही जागतिक यादी स्कोपस या संशोधन डेटाबेसमधील माहितीवर आधारित असते.संशोधकांच्या दीर्घकालीन संशोधन कामगिरीबरोबरच विशिष्ट वर्षातील संशोधन योगदानाचाही या मूल्यमापनात विचार केला जातो. संशोधनाचा प्रभाव, शोधनिबंधांना मिळालेले संदर्भ (सायटेशन्स), एच-इंडेक्स, सहलेखन आणि सी-स्कोअर यांसारख्या विविध निर्देशांकांच्या आधारे संशोधकांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते.

विज्ञानातील विविध मुख्य विषय आणि त्यांतील उपविषयांमध्ये प्रभावी संशोधन करणाऱ्या संशोधकांची या यादीत दखल घेतली जाते.प्रा.डॉ. मोटे यांनी नॅनोमटेरियल्स, मेटल ऑक्साईड्स, नॅनोसंरचित पातळ पटल आणि गॅस सेन्सर्स यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांमध्ये संशोधन केले आहे. पदार्थविज्ञान आणि उपयोजित भौतिकशास्त्र या क्षेत्रांशी संबंधित त्यांच्या संशोधनातून प्रगत संवेदक तंत्रज्ञान आणि विविध उपयोजित वैज्ञानिक संशोधनासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळाले आहे.त्यांच्या संशोधन कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जात असून, त्यांच्या शोधनिबंधांचा संदर्भ जगभरातील संशोधकांकडून घेतला जात आहे.ग्रामीण भागातून शैक्षणिक प्रवास सुरू करून जागतिक संशोधन क्षेत्रात सातत्यपूर्ण योगदान नोंदविणे ही उल्लेखनीय बाब आहे.सलग सहा वर्षे या प्रतिष्ठित



यादीत स्थान मिळविणे हे प्रा. डॉ. मोटे यांच्या संशोधनातील सातत्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि ज्ञाननिर्मितीप्रती असलेली बांधिलकी दर्शवते. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. विश्वनाथ मोटे यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी असे म्हणाले की, दयानंद शिक्षण संस्था संचालित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संशोधक प्रा. डॉ. विश्वनाथ मोटे हे सातत्याने दरवर्षी जागतिक स्तरावरील अव्वल दोन टक्के संशोधकांच्या यादीत स्थान मिळवत आहेत.त्यांच्या या यशामागे सातत्यपूर्ण संशोधन कार्य आणि संशोधनाप्रती असलेली निष्ठा आहे. ही बाब दयानंद शिक्षण संस्था आणि दयानंद विज्ञान महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, नवसंशोधकांना निश्चितच प्रेरणा देणारी आहे.डॉ. मोटे यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. भविष्यातही त्यांनी अशीच उज्ज्वल कामगिरी करावी, यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या तर प्रा.डॉ. विश्वनाथ मोटे यांच्या या यशामुळे दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या संशोधन क्षेत्रातील योगदानाला जागतिक स्तरावर अधिक ओळख मिळाली आहे.तसेच नव्या पिढीतील संशोधकांना जागतिक दर्जाचे संशोधन करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी केला.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ललितभाई शाह ,संयुक्त सचिव विशाल लाहोटी, डॉ.पद्मावती बियाणी,प्रणव शाह, निखिल राठी,कुणाल कोरे, संस्थेचे एडिओ डॉ. जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,सिनेट सदस्य डॉ.महेश बेंबडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,डॉ.युवराज सारणीकर, डॉ.शिवाजी आळणे, डॉ. विजेंद्र चौधरी,डॉ.टी.एच. मुजावर, डॉ.महादेव पंडगे, डॉ.शंकर बिराजदार, ग्रंथपाल प्रा.किरण भिसे, डॉ.दीप्ती ढेरे, डॉ.एस. डी.लोखंडे, संशोधक विद्यार्थिनी मानसी लोखंडे आणि अंकांक्षा जावळे,कार्यालय अधीक्षक नवनाथ भालेराव यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सहकारी प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जागृती शुगरच्या १५ व्या गळीत हंगामाचा दिलीपराव देशमुख साहेब यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी:** सन १९७२ पेक्षा अधिक सध्या दुष्काळ पडला आहे लोकं चिंताग्रस्त आहेत मात्र आम्ही मांजरा साखर परिवाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पदरात जास्तीत जास्तदर देण्याचा प्रयत्न करणार असून शेतकऱ्यांची भक्कम साथ मिळाल्याने परिवाराने यश मिळवले मला दोन सहकार क्षेत्रातील पुरस्कार मिळाले त्यात आपला सिंहाचा वाटा आहे तो आपल्याला समर्पित केला आहे जागृती शुगर चालू हंगामात ऊसाला पहिला हप्ता ३०००/ तीन हजार रुपये तर गाळप पेमेंट १० दिवसात व गतवर्षी दिलेल्या भावापेक्षा १०० रुपये अधिक दर देण्याची घोषणा राज्याचे माजी मंत्री जागृती शुगर चे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी सोमवारी सायंकाळी तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजच्या १५ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

**सहकार क्षेत्राला जपण्याची गरज माजी मंत्री दिलीपराव देशमुख**

जिल्ह्यात सहकारी संस्था मांजरा परिवाराचा माध्यमातून अतिशय पारदर्शक कारभार करत शेतकऱ्यांना अधिक मदत करण्याची भूमिका सहकार क्षेत्राच्या माध्यमातून आपण करत आहोत त्यासाठी आपला प्रथम पाया म्हणजे जिल्हा बँक तर कळस म्हणजे साखर कारखाने मंदिर पताका उभी आहे याला जपण्याची गरज आहे असे सांगून या सहकार क्षेत्रात योग्य विचारांच्या माणसांच्या पाठीमागे उभे रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**देशात टाटा राज्यात मांजरा**



देशात लोखंड इंडस्ट्रीज मधे जसे टाटा ने नाव विश्वासाची उपाधी मिळवली तशीच साखर इंडस्ट्रीजमध्ये राज्यात मांजरा साखर परिवाराने विश्वासाची उपाधी मिळवली असून कुठलाही जात धर्म न बघता आपली जात शेतकरी हा डोळ्यासमोर ठेवून सर्वांना मदत करण्याची भूमिका परिवाराने ठेवली आहे पुढेही ठेवू असा विश्वास व्यक्त करून या परिवारावर लाखो शेतकऱ्यांनी विश्वास ठेवला ऊस गाळपाला दिला पुढेही द्यावा असे आवाहन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले.

यावेळी जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांनी मागच्या १४ वर्षाच्या साखर कारखान्याचा प्रगतीचा आढावा घेत या भागात साखर कारखाना सुरू झाला आर्थिक स्थिती लोकांची मजबूत झाली दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनि आपला ऊस कारखान्याला द्यावा असे आवाहन त्यांनी केले यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष विजयकुमार पाटील , डॉ अरविंद भातंबरे,कल्याण पाटील गजानन भोपणीकर दिलीप पाटील नागराळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे जागृती शुगर उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख मारुती चे अध्यक्ष शाम भोसले जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव रेणा चे उपाध्यक्ष अँड प्रवीण पाटील मारुती चे उपाध्यक्ष सचिन पाटील जिल्हा बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर जयेश माने अनुप शेळके गोविंदराव भोपणीकर गजानन भोपणीकर, शंकर पाटील तळेगावकर जिल्हा परिषद सदस्य औदुंबर पांचाळ जिल्हा काँग्रेसचे कोषाध्यक्ष वैजनाथ लुल्ले, काँग्रेस समन्वयक सचिन दाताळ ,मीडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी, रेणा चे संचालक संभाजी रेड्डी, संचालक शंकर पाटील, रणजीत पाटील, बालाजी हाके, संभाजी सूळ मालवा घोणसे प्रभाकर केंद्रे प्रभाकर बंडगर आबासाहेब पाटील संजय बिराजदार विजयकुमार पाटील भगवान गायकवाड राम भंडारे जागृती शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले यांच्या सह विविध खाते प्रमुख अधिकारी ऊस उत्पादक शेतकरी सभासद हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना शहरप्रमुख मोहन दिवटे यांच्या निवेदनाची दखल; डॉ. गोऱ्हे यांचे आभार

**लातूर/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी शिवसेना लातूर शहरप्रमुख मोहन उर्फ खंडेराव तुकाराम दिवटे यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना निवेदन देऊन शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची विनंती केली होती. या विनंतीची दखल घेत डॉ. गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केल्याबद्दल दिवटे यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

दिवटे यांनी ९ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांच्या तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.

यामध्ये नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात यावे, खरीप हंगाम २०२५ साठी पीकविमा हप्ता भरूनही पीकविमा रक्कम न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना थकबाकी अदा करण्यात यावी, तसेच उजनी मानार प्रकल्पांतर्गत भोळवाडी, जोडहांडी, विजयनगर तांडा, धनवाडी व नागझरी या गावांना शेतीसाठी पाणीपुरवठ्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी, अशा मागण्यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांच्या या प्रश्नांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची दखल घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केल्याबद्दल डॉ. नीलमताई गोऱ्हे यांचे मनःपूर्वक आभार. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवू, अशी भावना शिवसेना लातूर शहरप्रमुख मोहन उर्फ खंडेराव तुकाराम दिवटे यांनी व्यक्त केली.

## थॅलेसेमिया व क्षयरोगाचे वेळीच निदान होणे अत्यावश्यक - डॉ. गावसाने

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे थॅलेसेमिया व क्षयरोग या आजारांविषयी विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विशेष जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास शहर नोडल अधिकारी डॉ. स्वाती मजगे आणि डॉ. भालचंद्र रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. योगेश गावसने प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपालजी लोहिया यांनी क्षयरोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी जनजागृती, वेळेवर निदान, नियमित उपचार आणि रुग्णांचे योग्य समुपदेशन अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी स्वतः क्षयरोगाची तपासणी करून घेतल्याचे सांगत आरोग्य तपासणीच्या महत्त्वावर भर दिला. डॉ. स्वाती मजगे यांनी थॅलेसेमिया या अनुवांशिक रक्तविकाराची कारणे, लक्षणे, निदानपद्धती आणि उपलब्ध उपचारांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. हिमोग्लोबिन निर्मितीतील दोषामुळे उद्भवणाऱ्या रक्तक्षयासह विविध आरोग्यविषयक गुंतागुंतींची माहिती देत त्यांनी वेळेवर निदानाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. योगेश गावसने यांनी थॅलेसेमियाच्या निदानासाठी आवश्यक असलेल्या संपूर्ण रक्त तपासणी तपासणीतील एमसीव्ही व एमसीएच निर्देशांकांचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच हिमोग्लोबिनचे विविध प्रकार ओळखण्यासाठी एचपीएलसी तपासणीची उपयुक्तता विशद केली.

या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना दोन्ही आजारांचे गांभीर्य, निदान, रुग्ण समुपदेशन आणि उपचारपद्धतींबाबत उपयुक्त माहिती मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समन्वयक प्रा. प्रसाद कावळे यांनी केले.

## 'प्रगतिशील महाराष्ट्र-२०२६' प्रदर्शनात महावितरणच्या स्टॉलचा गौरव'

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या 'प्रगतिशील महाराष्ट्र-२०२६' प्रदर्शनात परिणामकारक मांडणी व ग्राहकांशी प्रभावी संवाद साधल्याबद्दल महावितरणच्या स्टॉलचा 'बेस्ट स्टॉल' म्हणून गौरव करण्यात आला. अमळनेर येथे आयोजित तीन दिवसीय प्रदर्शनात केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध विभागांच्या वतीने एकूण ७५ स्टॉल उभारण्यात आले होते. यात स्टॉलची उत्कृष्ट मांडणी आणि ग्राहकांशी प्रभावी संवाद केल्याबद्दल महावितरणच्या स्टॉलचा गौरव करण्यात आला.




खासदार स्मिता वाघ, अमळनेरचे आमदार अनिल पाटील, पारोळा - एरंडोलचे आमदार अमोल पाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट स्टॉलचा पुरस्कार मिळवणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. सांघिक कार्यालयातील उपमुख्य जनसंपर्क अधिकारी प्रवीण स्थूल, अमळनेरचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता ज्ञानेश्वर अंबाडकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

महावितरणच्या दालनात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसह स्मार्ट मीटरच्या फायद्याची माहिती देण्यात आली. तीन दिवसांत जवळपास १२ हजारांहून अधिक नागरिकांनी महावितरणच्या स्टॉलला भेट दिली. जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी, अधीक्षक अभियंता मदन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्टॉल उभारण्यात आला. धरणगाव विभागाचे कार्यकारी अभियंता नीलेश सोनगिरे, जळगाव परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, उपकार्यकारी अभियंता मनोज भावसार, सहायक अभियंता हितेंद्र बढे, मनोज वाडिले, विनायक बोरसे, हेमंत सैदाणे, नितीन ठवकर, मोहन नेवाळे, भाऊसाहेब महाजन, तंत्रज्ञ दीपक अहिरे, सुषमा हजारे यांनी प्रदर्शनादरम्यान ग्राहकांना सर्व योजनांची माहिती दिली. तसेच विद्युत सुरक्षा व वीजबचतीबाबत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. यावेळी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात येऊन विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. दालनात ग्राहकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यावर तत्परतेने कार्यवाही करण्यात आली.


**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**

**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# घटस्थापनेने श्री तुळजाभवानी देवींच्या शारदीय नवरात्र उत्सवास प्रारंभ



तुळजापूर (माध्यम कक्ष) महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास आज रविवार,आश्विन शुक्ल प्रतिपदेला घटस्थापना करून प्रारंभ झाला.आज पहाटे श्री तुळजाभवानी मंदिरात पारंपरिक पद्धतीने श्री तुळजाभवानी देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली.

दुपारी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते घटस्थापना विधी पार पडला.यावेळी आमदार तथा विश्वस्त राणाजगजितसिंह पाटील,जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील,नगराध्यक्ष तथा विश्वस्त विनोद गंगणे,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त ओंकार देशमुख, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने,उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकारी, महंत तुकोजी बुवा,महंत चिलोजी बुवा, महंत वाकोजी बुवा,महंत हमरोजी बुवा, सहायक व्यवस्थापक (सामान्य) जयसिंग पाटील,सहायक व्यवस्थापक (प्रशासन) नागेश शितोळे,सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले,अनुप ढमाले, रामेश्वर वाले,पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम,विपिन शिंदे,अनंत कोंडो यांच्यासह पुजारी बांधव व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**घटस्थापनेचे महत्व**

घट बसविण्याची जागा ही सिंहाच्या गाभाऱ्यात देवींच्या डाव्या बाजूला असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी श्री तुळजाभवानी देवीला अर्पण केलेल्या जमिनीतील माती घटस्थापनेकरिता आणली जाते.त्या मातीला 'वावरी' असेही म्हणतात.प्रथेप्रमाणे धाकटे तुळजापुरातील कुंभार कुटुंबीयांकडून कलश येतो.या कलशामध्ये गोमुख व कल्लोळ तीर्थाचे पाणी भरलेले असते.जिल्हाधिकारी व पुजाऱ्यांच्या उपस्थितीत गोमुख तीर्थाजवळ गंगा आवाहन केले जाते. त्यानंतर वाजत गाजत घट कलश सिंहाच्या गाभाऱ्यात आणून प्रतिष्ठापित केला जातो.

तसेच तुळजापुरातील शेटे कुटुंबीयांकडून सप्तधान्य (जवस, करडई,मूग,ज्वारी,गहू, मका व सातू) दिले जाते.घटाची स्थापना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते केली जाते.

देवींची पहिली माळ जी नागवेलीच्या पानांची असते,ती माळ घटा वर अर्पण केली जाते.घटस्थापनेनंतर मंदिर संस्थानच्या वतीने ब्राह्मणास पाठ,हवन व अनुष्ठानासाठी वर्णी दिली जाते.

# सेवा संकल्प अभियान:आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहात स्वच्छ,सुंदर व निरोगी परिसर उपक्रम

धाराशिव,(जिमाका) प्रकल्प कार्यालय, शासकीय आश्रमशाळा,अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहामध्ये स्वच्छ,सुंदर, निरोगी व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने २ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष स्वच्छ,सुंदर व निरोगी आश्रमशाळा व वसतिगृह अभियान राबविण्यात येत आहे.

त्यानुसार ३ शासकीय आश्रमशाळा,२ अनुदानित आश्रमशाळा व ६ शासकीय वसतिगृह इत्यादी ठिकाणी ८ ऑक्टोबर रोजी स्वयंपाकगृह व भोजनगृह स्वच्छता दिवस साजरा केला असुन यामध्ये शासकीय, अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वरीतिगृहामधील स्वयंपाकघर,बुली/ गैस परिसर, भांडी ठेवण्याची जागा,धान्य साठवण कक्ष,भोजनगृह,हात धुण्याची जागा यांची स्वच्छत्ता,अन्न साठवणुक व स्वच्छतेची पाहणी व स्वच्छता करण्यात आलेली आहे.

# पदापेक्षा माणुसकी मोठी!– उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश

## शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त गौरव सोहळा उत्साहात संपन्न

धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)– रईभर येथे शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात धाराशिवचे उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी विद्यार्थ्यांना जीवनात मोठे पद मिळविण्यासोबतच चांगला माणूस बनण्याचा मोलाचा संदेश दिला. यशस्वी होण्यासाठी शिक्षणासोबत माणुसकी, शिस्त, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित या कार्यक्रमात कडवकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वतः ची कामे स्वतः करण्याची सवय लावावी, आई–वडिलांना मदत करावी, मोबाईलचा अनावश्यक वापर टाळावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचे विचार आत्मसात करावेत, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने वागवणे आणि समाजासाठी विधायक कार्य करणे हेच खऱ्या यशाचे लक्षण असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या सोहळ्यात शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सुभाषदादा कोळगे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तसेच दैनिक 'धाराशिवनामा'च्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना कोळगे यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनुभव सांगत शिक्षण आणि समाजहितासाठी कार्यरत राहण्याची भूमिका व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. शिवाजी बारगळ गुरुजी होते.



प्रास्ताविक माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे यांनी केले. यावेळी नायब तहसीलदार मुस्तफा खोंडे, माजी मुख्याध्यापक आगतराव भोईटे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना केवळ करिअरमध्ये यशस्वी होण्याची नव्हे, तर चांगले संस्कार जोपासून जबाबदार नागरिक बनण्याची प्रेरणा मिळाली. शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या कार्याचा गौरव आणि विद्यार्थ्यांना मिळालेले मार्गदर्शन यामुळे हा सोहळा विशेष ठरला.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


# धाराशिव जिल्हा पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

नळदुर्ग (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत बालाज , वय ३९ वर्षे, रा. शास्त्री चौक नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.१२.१०.२०२६ रोजी अहिल्यादेवी होळकर चौक नळदुर्ग येथील नगर परिषद रोडवर अंदाजे ७,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु स्कुटीसह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर संदीप वय २८ वर्षे, रा. खुदवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.१२.१०.२०२६ रोजी १३.०० वा. सु.जळकोट बसस्थानकाजवळील सुभेदार चहाचे व यशमशिनरी चे बोळात आडोशाला अंदाजे ४,८०० किंमतीची ६० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर राजेंद्र वय ५३ वर्षे, रा. सलगरा दिवटी ता. तुळजापूर जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.१२.१०.२०२६ रोजी १६.३० वा. सु. सलगरा दिवटी ते गंधोरा जाणारे रोडच्या अंदाजे १,३०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ११ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वंतत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची चौथी यादी प्रसिद्ध : जिल्ह्यातील १३ हजार ७०० शेतकऱ्यांची नाव

*** आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन**
*** कर्जमाफीसाठी बँकेत पैसे भरण्याची गरज नाही**
*** आधार प्रमाणीकरणानंतरच मिळणार लाभ**

धाराशिव (जिमाका)– कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०१६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत जिल्ह्यातील १३ हजार ७०० थकीत कर्जदार शेतकऱ्यांच्या नावांचा समावेश आहे.यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी तातडीने आधार प्रमाणीकरण करावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

राज्यातील अनेक शेतकरी बँकांचे कर्ज घेऊन थकबाकीत गेल्यामुळे त्यांना नव्याने पीककर्ज मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. परिणामी, शेतीच्या पुढील हंगामासाठी आवश्यक भांडवल उभे करणेही त्यांच्यासाठी कठीण झाले होते.अशा शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने कर्ज घेण्यास पात्र करून शेतीला आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने २ जून २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून कर्जमुक्ती योजना जाहीर केली.

या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०१५ रोजी थकीत असलेल्या आणि १ एप्रिल २०११ नंतर कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत अल्पमुदत पीककर्ज माफीचा लाभ देण्यात येत आहे.दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकरकमी परतफेड योजना लागू करण्यात आली आहे.या योजनेंतर्गत ३१ मार्च २०२७ पूर्वी कर्जाची परतफेड केल्यास राज्य शासनाकडून दोन लाख रुपयांपर्यंत लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.तसेच नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याचा शासन निर्णयही जाहीर करण्यात आला आहे.

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचावेत, यासाठी महा–आयटीमार्फत संगणकीय पोर्टल विकसित करण्यात आले आहे.या पोर्टलवर बँकांकडून थकीत अल्पमुदत पीककर्ज असलेल्या शेतकऱ्यांची माहिती भरण्यात आली.प्राप्त माहितीवर महा–आयटीमार्फत संगणकीय प्रक्रिया करून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

याअंतर्गत २२ जुलै २०२६ रोजी ५३३ शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली.त्यानंतर २४ जुलै २०२६ रोजी राज्यातील सुमारे १६.९६ लाख शेतकऱ्यांची दुसरी यादी,११ सप्टेंबर २०२६ रोजी सुमारे ३.५६ लाख शेतकऱ्यांची तिसरी यादी आणि १२ ऑक्टोबर २०२६ रोजी ३.५१ लाख शेतकऱ्यांची चौथी यादी (VK List-3) आधार प्रमाणीकरणासाठी राज्यस्तरावर जाहीर करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही या याद्यांमधून मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळत आहे. दुसऱ्या यादीत जिल्ह्यातील ४६ हजार ९१५ थकीत कर्जदार शेतकऱ्यांची गावनिहाय यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. तिसऱ्या यादीत २१ हजार ९६६ थकीत कर्जदार शेतकऱ्यांची नावे जाहीर करण्यात आली. आता १२ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या चौथ्या यादीत जिल्ह्यातील आणखी १३ हजार ७०० थकीत कर्जदार शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या सर्व याद्यांमधील जिल्ह्यातील एकूण ८२ हजार ५१ शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. संबंधित शेतकऱ्यांना आपल्या नावाचा समावेश यादीत आहे किंवा नाही,याची माहिती सहज उपलब्ध व्हावी,यासाठी याद्या वेगवेगळ्या मोबाईल ग्रुपवर तसेच प्रत्येक गावातील ग्रामपंचायत कार्यालय,तलाठी कार्यालय आणि चावडीवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या जिल्ह्यातील ४९ हजार ७९४ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर आतापर्यंत कर्जमाफीची ४५७ कोटी १८ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. त्यामुळे कर्जमाफीची प्रक्रिया प्रत्यक्ष लाभाच्या टप्प्यापर्यंत पोहोचली असून,अद्याप आधार प्रमाणीकरण न केलेल्या शेतकऱ्यांनीही ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे.

***कर्जमाफीसाठी बँकेत कोणतीही रक्कम भरू नका***

प्रसिद्ध करण्यात आलेल्या याद्यांमधील सर्व शेतकरी कर्जमाफी योजनेत समाविष्ट असून,त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी बँकेकडे कोणतीही रक्कम भरावी लागणार नाही,असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.त्यामुळे कर्जमाफीच्या नावाखाली कोणीही शेतकऱ्यांकडून पैशांची मागणी केल्यास त्यास बळी पडू नये.

आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्यानंतरच संबंधित शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. त्याचबरोबर संबंधित शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक क्रमांकही देणे आवश्यक आहे.

***दोन दिवसांत आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन***

चौथ्या यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता दोन दिवसांच्या आत आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.यापुढे आणखी पाचवी यादी प्रसिद्ध होण्याची शक्यता असून, आवश्यकता भासल्यास सहावी यादीही पुढील काही दिवसांत प्रसिद्ध होणार आहे.

त्यामुळे सध्याच्या यादीत नाव नसलेल्या शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये.विशेषतः ३० सप्टेंबर २०१५ रोजी अल्पमुदत पीककर्ज थकीत असलेल्या आणि १ एप्रिल २०१९ नंतर कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची नावे पुढील याद्यांमध्ये येऊ शकतात.अशा शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित बँक शाखेशी संपर्क साधून कर्जखात्याची माहिती आणि यादीतील नावाबाबत खात्री करून घ्यावी.

शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक उभारी देण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या या कर्जमुक्ती योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचावा,यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व संबंधित शेतकरी बांधवांनी प्रसिद्ध झालेल्या याद्या तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी,असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विविध कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत: (१) निविदा सूचना क्र.: 36-2026-SrDENC. कामाचे नाव: ADEN/SUR(N) उप-विभागांतर्गत SSE (P.Way) SUR(N) विभागातील विविध 'P.Way' (रेल्वे मार्ग) संबंधित कामे - दोन वर्षांच्या कालावधीसाठी. कामाचा अंदाजित खर्च: २,२०,१८,४७९.२४; अनामत रक्कम: ४,४०,४००.००. (२) निविदा सूचना क्र.: 37-2026-SrDENC. कामाचे नाव: ADEN/SUR(N) उप-विभागांतर्गत SSE/P.Way/MO विभागातील विविध 'P.Way' संबंधित कामे - दोन वर्षांच्या कालावधीसाठी. कामाचा अंदाजित खर्च: १,६६,६३,३४६.३०; अनामत रक्कम: ३,३३,३००.००. (३) निविदा सूचना क्र.: 38-2026-SrDENC. कामाचे नाव: SSE/P.Way/USFD/SUR अंतर्गत USFD ओपन लाइन टीमसोबत काम करण्यासाठी सेवा पुरवणे - दोन वर्षांच्या कालावधीसाठी. कामाचा अंदाजित खर्च: ४,१०,६३,८९५.९०; अनामत रक्कम: ८,२१,३००.००. काम पूर्ण करण्याचा कालावधी: प्रत्येक निविदेसाठी २४ महिने. देखभाल कालावधी: प्रत्येक निविदेसाठी लागू नाही . निविदा उघडण्याची तारीख: प्रत्येक निविदेसाठी ३०.१०.२०२६. इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी संकेतस्थळाला वारंवार भेट देऊन या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके तपासावीत. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

EXP-36 DRM (कामे), सोलापूर

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 PRGI No. MAHMAR/2003/11649